


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३०.०५.२०२५ अंक नं. ५१ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30 ते 70% डिस्काउंट सेल
आला रे आला राजपाल सेल आला..!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel.: (0241) 2418720 Mob. 9372497999




## स्व. श्री. खुशालचंदजी तेजमलजी डागा

स्वर्गवास दि. ३० मे २००८

**पूज्य भाऊसा...**

आपण केलेल्या संस्कारांची शिदोरी हीच आमची शक्ती आहे.
फक्त भौतिक यशाला जीवनाचे उद्दिष्ट न बनविता......

चांगल्या हेतूने प्रामाणिकपणे व निष्ठेने आपले कार्य करीत रहावे
हा आपला संदेश आमचे स्फूर्तीस्थान आहे.

आज सतराव्या पुण्यस्मरणदिनी आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

प्रवीणकुमार, संजय - सौ. ममता, दिनेश - सौ. कविता
एवं समस्त डागा परिवार : अहिल्यानगर - पुणे
अभिजीत - सौ. अंजली चोरबेले, पुणे : सौ. मीना- दिनेशजी मुनोत, संभाजी नगर
सौ. अविना - प्रितेशजी कटारिया, पुणे

सूरज इन्फो प्रा. लि. : ॲड मेथडस इंडिया प्रा. लि.
असेन्ट कॉन्ट रिसर्च प्रा. लि. : डागा ग्रोथ सोल्युशन्स : ऑरेंज कॉन्ट रिसर्च LLP


स.न.वि.वि.,
प्रिय नगरकर,

"गावाचं नाव बदललं तरी, गावाची माती, माणसांची नाती, ऋणानुबंध आणि आठवणी चिरकाल राहतात."

गावाच्या नावाचा बदल स्वीकारणं म्हणजे इतिहास विसरणं नव्हे, तर नव्या नावाचा नवा अभिमान, नवी प्रेरणा घेऊन पुढे जाण्याचं सामर्थ्य जोपासणं आहे.

शेवटी, बदल हे शाश्वत सत्य आहे.

आणि म्हणूनच, आपल्या नगरकरांसाठी आम्ही घेऊन येत आहोत, अनुष्का मोशन पिक्चर्स अँड एंटरटेनमेंट्स आणि अहिल्यानगर फिल्म कंपनी प्रस्तुत, शॉर्टफिल्म
'नामांतर'

आपले स्नेहांकित,
नरेंद्र शांतीकुमार फिरोदिया
संस्थापक, आय लव्ह नगर

पोस्टकार्ड/POSTCARD

I ❤ नगर® YOUR LOVE FOR THE CITY

अनुष्का मोशन पिक्चर्स & एंटरटेनमेंट्स आणि
अहिल्यानगर फिल्म कंपनी प्रस्तुत,
नरेंद्र शांतीकुमार फिरोदिया, अभिजीत अरविंद दळवी कृत

नामांतर

नाव बदललं गावाचं तर...

शॉर्टफिल्म पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

Premiering on YouTube I Love Nagar | 4K ULTRA HD

ONEVOICE.CO.IN

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# केडगावात पहाटेच्यावेळी रस्त्यात अडवून तिघांकडून 'महावितरण'च्या अभियंता, कर्मचाऱ्यांना मारहाण

नगर – वीज पुरवठा बंद झाल्याने त्याचा बिघाड शोधत असलेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तिघांनी रस्त्यात अडवून तुम्ही फोन का उचलत नाही. वीज का गेली आहे. असे म्हणून शिवीगाळ दमदाटी करीत दगडाने मारहाण केल्याची घटना ३० मे रोजी पहाटे ३.३० वाजेच्या सुमारास केडगाव येथे नेप्ती रोड वरील म्हसोबा मंदिर जवळ व रंगोली हॉटेल जवळ घडली. यावेळी एकाने तर वीज कर्मचाऱ्यांच्या खिशातील २ हजार रुपये बळजबरीने काढून नेले.

याबाबत महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल सिताराम शिलावंत (वय ३५, रा. शिवकृपा स्वीट जवळ, नाशिक, हल्ली रा. शाहूनगर, केडगाव) यांनी दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की केडगाव, भूषणनगर येथील विद्युत पुरवठा खंडित झाल्याने तो नेमका कोठून खंडित झाला याचा शोध लागत नसल्याने पहाटे तीन वाजल्याच्या सुमारास फिर्यादी यांनी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ योगेश बेरड यांना तो शोधण्यासाठी पाठवले. फिर्यादी व बाह्यस्रोत तंत्रज्ञ शंकर परभणे हे विद्युत पुरवठा नेमका कोठून खंडित झाला हे शोधत असताना त्यांच्याजवळ एक इसम आला व म्हणाला तुम्ही महावितरणचे कर्मचारी आहात काय? तुम्ही फोन का उचलत नाही? वीज का गेली आहे. असे म्हणून त्याने शिवीगाळ केली.

तेव्हा फिर्यादी यांनी शिवीगाळ करु नका. आम्ही वीज नेमकी कशामुळे गेली हे शोधत आहोत. वीज लवकर येईल असे सांगत असताना आलेल्या इसमाने तुम्ही तुमचे काम कसे करता तेच पाहतो. असे म्हणून शिवीगाळ व धक्काबुक्की केली. आणि फिर्यादीच्या शर्ट खिशातील २ हजार रुपये बळजबरीने काढून घेतले. यावेळी फिर्यादी यांना सोडवण्याकरता परभणे व योगेश बेरड आले असता त्यांनाही शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. तसेच फोनवरुन कोणालातरी बोलावून घेतले. या प्रकारामुळे फिर्यादी व अन्य कर्मचारी तेथून घाबरुन निघून गेले. त्यानंतर कर्मचारी परभणे यांना तिघांनी हॉटेल रंगोली जवळ अडवून दगडाने मारहाण केली. या मारहाणीत परभणे हे जखमी झाले. यावेळी मारहाण करणाऱ्या इसमाचे नाव सागर म्हस्के (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) असे असल्याचे समजले. याप्रकरणी अभियंता राहुल शिलावंत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी सागर म्हस्के व त्याच्यासोबतचे दोन अनोळखी इसम यांच्या विरुद्ध बी एन एस कलम १२१ (२), १३२, ११९ (१), १२६(२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...





आयझॅक न्यूटन

### आपल्या हृदयात कोण राहते?

महान शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटन यांचा देवाच्या शक्तीवर विश्वास होता. खालील प्रेरणादायी घटना त्यांच्या देवाविषयी सकारात्मक शक्तीचे नवीन दर्शन घडवते.

न्यूटन शाळेत असताना एकदा वर्गात त्यांचे बुद्धीवादी विज्ञान शिक्षक म्हणाले की, देव अस्तित्वात असेल तर मी सिद्ध करेन की देव वाईट आहे, कारपण जग निर्माण केले तेव्हा त्याने वाईटसुद्धा निर्माण केले.

यावर न्यूटनने एक प्रश्न विचारला, ''माफ करा सर, थंडी असते का?'' त्यावर शिक्षक म्हणाले, ''हा कसला प्रश्न, अर्थात थंडी असतेच. तुला नाही का वाजत थंडी?''

न्यूटन यावर म्हणाले, ''सत्य हे आहे की, थंडी अस्तित्वात नाही, भौतिकशास्त्राच्या नियमांनुसार थंडी म्हणजे केवळ उष्णतेचा अभाव. आता मला सांगा, अंधार अस्तित्वात आहे का?''

शिक्षक विचार करीत म्हणाले, अंधार नक्कीच असतो. मग न्यूटनने ते दुरुस्त केले व म्हमाले, ''नाही सर, अंधारही अस्तित्वात नाही. अंधार म्हणजे फक्त प्रकाशाचा अभाव. म्हणूनच आपण प्रकाशाचा अभ्यास करू शकतो, अंधाराचा नाही.''

याप्रमाणेच देवाच्या अस्तित्वाचा आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात अभाव असतो.

न्यूटनच्या शिक्षकांना समजत नव्हते की, त्यांचा हा हुशार विद्यार्थी हे प्रकरण कोणत्या दिशेने घेऊन जात आहे.

चर्चा देवाच्या अस्तित्वाबद्दलही होती. गोंधळलेल्या शिक्षकांना पाहून न्यूटन म्हणाले, ''थंडी व अंधाराप्रमाणे वाईट ही देखील अनुपस्थितीची अवस्था आहे. खरं तर आपल्या हृदयात देवाची उपस्थिती नसते तेव्हा वाईट, नकारात्मकता अस्तित्वात असते.''

बुद्धिवादी शिक्षक (आपल्या सामान्यांप्रमाणे) आता निःशब्द झाले होते...

## अन्नधान्य व जनावरांना चारा घेवून खासदार नुकसानग्रस्तांच्या भेटीला

### तालुक्यातील अतिवृष्टीबाधित गावांत निलेश लंके यांनी वाड्यावस्त्यांवर केली पाहणी

नगर – सलग दहा, बारा दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे नगर जिल्ह्यात मोठे नुकसान झाले. तर नगर तालुक्यातील सारोळा कासार, अकोळनेर, खडकी, वाळकी परिसरात अतिवृष्टी आणि महापुराने हाहाकार माजवला. या नुकसान ग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मदतीला खा. निलेश लंके धावून गेले. त्यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या समवेत नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. तसेच या वेळी त्यांना धीर देत अन्नधान्य किट व जनावरांसाठी चाऱ्याचे वाटपही केले.





अतिवृष्टी व महापुराने नुकसान झालेल्या गावांत पाहणी करत शेतकऱ्यांना अन्नधान्य किट व जनावरांना चारा वाटप करताना खा. निलेश लंके. समवेत माजी जि. प. सदस्य बाळासाहेब हराळ, योगीराज गाडे, शिवसेना तालुका प्रमुख राजू भगत, सरपंच प्रवीण कोठुळे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड आदी.

या पाहणी दौऱ्यात खासदार लंके यांच्यासह माजी जि. प. सदस्य बाळासाहेब हराळ, नगरसेवक योगीराज गाडे, तालुकाध्यक्ष राजू भगत, नितीन पवार, ग्रा. पं. सदस्य वसंत गारुड, अरुण जाधव, सचिन शिंदे, बहु गहिले, सुहास कासार, संदिप बोठे, दिलीप भालसिंग, सागर कासार, माऊली लंके यांचा समावेश होता. वाळकीतील गंगाराम जुंदरे व परसराम जुंदरे यांच्या २५ गाई व ४० शेळ्या वाहून गेल्या, येथील पुलही वाहून गेला. फळबागांसह चारा वाहून गेला. ही माहिती समजताच खासदार निलेश लंके यांनी स्वतः जुंदरे वस्तीवरील बंधाऱ्याचे दरवाजे उघडले व तातडीने शेतकऱ्यांना जनावरांच्या चाऱ्याची व किराणा सामानाची व्यवस्था करून दिली.

खडकी येथील नंदू रोकडे यांच्या आठ जर्सी गाई व जनावरांचा संपूर्ण चारा वाहून गेला. त्यांच्या कुटुबिंयांनी गाईच्या गोठ्यावरील छतावर आधार घेतला. खडकी येथील दीपक सयाजी कोठुळे व संतोष सयाजी कोठुळे या बंधूंनी लाईटच्या खांबाचा आधार घेत जीव वाचवला. त्यांची कांदा चाळ, मुरघास, चारा उपयोगी वस्तू, विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य व कागदपत्रे सर्व वाहून गेले. ज्योती दीपक कोठुळे, कल्याणी ज्ञानदेव कोठुळे, श्रद्धा संतोष कोठुळे यांनी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीवर चढून स्वतःची वाचवला. या पुरातून नागरिकांना बाहेर काढणाऱ्या तरुणांचा यावेळी खा.लंके यांनी सत्कार केला. खडकी येथे सरपंच प्रवीण कोठुळे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, माजी सरपंच शरद कोठुळे, अमृता कोठुळे, अशोक कोठुळे, बापू कोठुळे, पंढरी नाना कोठुळे, विनोद सातार, नवनाथ गायकवाड, मंगेश शिंदे, विनोद निकम, ऋषी निकम, संदीप कोठुळे, दीपक कोठुळे, संजय पवार, सोमनाथ कोठुळे, सागर गायकवाड, केतन रोकडे, राहुल निकम, सयाजी रोकडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

सारोळा कासार येथे रस्ते उखडले असून स्मशानभूमी वाहून गेली आहे. याची पाहणी करताना राजाराम धामणे, गोराभाऊ काळे, नामदेव काळे, गजानन पुंड, ग्रामपंचायत सदस्य रोहित काळे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी लिंबोरे, अण्णा काळे, गोरख काळे, सुरेश धामणे, विलास धामणे, अमोल कडूस, सुरज कडूस, नारायण कडूस व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

अकोळनेर येथे तरवडी रोड, सारोळा मार्गे थोरात वस्ती, भोर वस्ती, फणसाचा मळा, जाधववाडी, मेहेत्रे मळा, भोरवाडी रोड, रस्ते पूर्णपणे वाहून गेले आहेत. गाव तळे पण वाहून गेले. या ठिकाणी पाहणी करते वेळी अविनाश जाधव, अरुण जाधव, माजी उप सरपंच मच्छिंद्र जाधव, माजी सरपंच गंगाधर ठुबे, माजी सरपंच गारुडकर, भूषण शेळके, अजय कोळगे, सतीश गायकवाड, बाळासाहेब शेळके, प्रशांत जाधव, दादा जाधव, सागर शेळके, भाऊसाहेब जाधव, संग्राम गायकवाड, अरुण जाधव, तात्याभाऊ जाधव, दादा रोहकले, आदेश शेळके, गणेश कोळगे इत्यादी उपस्थित होते. या दौऱ्यामध्ये महसूल विभाग, पाटबंधारे विभाग, महावितरण, कृषी व इतर विभागाचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेले

नगर – १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव लांडगा शिवारात २८ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान घडली. मुलगी घरात दिसून न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा पिंपळगाव लांडगा परिसर, नातेवाईक व तिच्या मैत्रिणीकडे शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. त्यामुळे तिला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत तिच्या वडिलांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात २९ मे रोजी फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहे.

## दादासाहेब सोले पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – पंकज कॉलनी,सावेडी येथील रहिवासी व सेवानिवृत्त



रेल्वे कर्मचारी दादासाहेब नारायण सोले पाटील (वय ९०) यांचे ३० मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विधिज्ञ प्रा. नीळकंठ सोले पाटील यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. भारत सोले पाटील यांचे चुलते तर एडीसीसी बँकेचे शाखाधिकारी महेश सोले पाटील यांचे ते वडील होत.

## शोभाचंद फिरोदिया यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – रामचंद्र खुंट येथील रहिवासी व अहमदनगर दाणेडबरा फिरोदिया ट्रेडिंग कंपनीचे संचालक शोभाचंद रायचंद फिरोदिया (वय ८७) यांचे २९ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## वसंत सोनवणे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – सिव्हील हडको येथील रहिवासी वसंत भिकाजी सोनवणे (वय ७०) यांचे २९ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे, पत्नी, २ मुले, १ सुन, नातवंडे, बहीण, भाऊ असा परिवार आहे. संदीप व राहुल सोनवणे यांचे ते वडील होत.

## पाराजी कोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी पाराजी रामभाऊ कोकोटे (वय १०६) यांचे ३० मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ मुली, २ नातू, नातसुना असा परिवार आहे. पै. राजूभाऊ कोकाटे व विजुभाऊ कोकाटे यांचे ते आजोबा होत.

## प्रमिलाताई जोशी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – कडा, ता. आष्टी, जिल्हा बीड येथील श्रीमती प्रमिलाताई



दामोधर जोशी (वय ९३, सध्या राहणार अहिल्यानगर) यांचे २३ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या नेहमीच धार्मिक, सामाजिक कार्यात अग्रेसर असायच्या, सर्व परिचित, नातेवाईक त्यांना 'ताई' या नावाने ओळखत असत. त्यांच्या पश्यात कॅन्टोन्मेंट शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक विजय जोशी व जिल्हा न्यायालयातील सेवानिवृत्त अधीक्षक विकास जोशी ही दोन मुले, मुलगी, सुना, पुतणे व नातवंडे असा परिवार आहे. प्रमिलाताई या थोर स्वातंत्र सैनिक कै. दामोधर दत्तात्रय जोशी यांच्या पत्नी होत.

## मुसळधार पावसाने केडगावात झालेल्या नुकसानीची उपायुक्तांनी केली पाहणी

### लवकरच मान्सून सक्रीय होणार असून, भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या

नगर – नुकतेच झालेल्या मुसळधार पावसाने केडगावमध्ये पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. झालेल्या नुकसानीची मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे व माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी पहाणी केली.



मुसळधार पावसाने केडगावात झालेल्या नुकसानीची उपायुक्तांनी केली पाहणी केली.

पावसामुळे केडगावमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे केडगावमध्ये राहत असणाऱ्या काही नागरिकांच्या घरात देखील पाणी शिरले. केडगाव अमरधामची संरक्षण भिंत देखील पावसाने वाहून गेली. देवी रोड वरील आंबेडकर भवनाची भिंतही कोसळली. कांबळे मळा येथील पूल वाहून गेला आहे. झालेल्या नुकसानीची पहाणी करुन तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनाने मनोज कोतकर यांनी उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना पाहणी करण्यासाठी बोलावून घेतले. यावेळी नुकसान झालेल्या भागाची पाहणी करण्यात आली.

मनोज कोतकर यांनी मुसळधार पावसाने केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मनपा प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने समस्या सोडविण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात पाठपुरावा सुरु आहे. लवकरच मान्सून सक्रीय होणार असून, भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या. लवकरच अमरधामची भिंत बांधली जाणार असून, नागरिकांनी देखील घाबरुन न जाता, मनपा प्रशासन त्यांच्या पाठिशी असल्याचे भावना व्यक्त केली. तर नागरिकांना देखील नुकसान भरपाई मिळण्याची मागणी त्यांनी केली.

उपायुक्त मुंडे यांनी झालेल्या नुकसानी संदर्भात तातडीने ठोस पाऊले उचलून उपाययोजना केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी शरद ठुबे, सुमित लोंढे, सोनु बापू घेबूड, बाला कोतकर, ऋषी गवळी, शुभम लोंढे, भाऊ गुंड आदी उपस्थित होते.

## एसटी बस प्रवासादरम्यान वृद्धाच्या गळ्यातील सोन्याच्या चेनची चोरी

नगर – पाथर्डी ते नगर असा एसटी बसने प्रवास करीत असलेल्या प्रवाशाच्या गळ्यातील १४.५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरून नेल्याची घटना २७ मे रोजी दुपारी घडली.

याबाबत किसन सदाशिव कांबळे (वय ७२, रा. मल्हारनगर, नवनागापूर, एमआयडीसी, अ.नगर) यांनी २९ मे रोजी रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २७ मे रोजी देवदर्शनाकरिता एसटी बसने मढी येथे गेले होते. देवदर्शन झाल्यानंतर दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घरी जाण्यासाठी तिसगाव (ता.पाथर्डी) येथून एसटी बसने नगर येथे येण्याकरिता निघाले. एसटी बस मध्ये गर्दी असल्याने तिसगाव ते नगर असा प्रवास त्यांनी बसमध्ये उभे राहून केला.

एसटी बस माळीवाडा बस स्थानक येथे आली असता पाऊस येत असल्याने बस ड्रायव्हरने बस इम्पिरियल चौकात उभी केल्याने फिर्यादी त्यांच्या जवळील रेनकोट घालून बसमधून खाली उतरले. रेनकोटची टोपी डोक्यात घालून तिची दोरी बांधत असताना त्यांच्या गळ्यात असलेली सोन्याची चेन गळ्यात नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी रस्त्यावर आजूबाजूला पाहिले असता चेन कोठेही मिळून आली नाही यावरुन फिर्यादी यांची खात्री झाली की तिसगाव ते नगर प्रवासादरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने गर्दीचा फायदा घेऊन गळ्यातील १४.५ ग्रॅम वजनाची चेन चोरुन नेली. याप्रकरणी किसन कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार सूर्यकांत डाके हे करीत आहेत.

## रुग्णवाहिका व दुधाच्या टँकरचा अपघात; दोन जणांचा मृत्यू तर एक जण जखमी

नगर – नगरहून चिचोंडी पाटील गावाकडे चाललेल्या रुग्णवाहिकेला समोरून येणाऱ्या दुधाच्या टँकरने रस्ता क्रॉस करून क्लीनर बाजूला समोरून जोराची धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात रुग्णवाहिकेतील दोघांचा मृत्यू झाला आहे. तर रुग्णवाहिका चालक जखमी झाला आहे. हा अपघात नगर–जामखेड रोडवर टाकळी काझी गावच्या शिवारात असलेल्या जुन्या टोलनाक्याजवळ २९ मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास झाला.



प्रमोद गायकवाड (मयत)



बाळासाहेब काळे (मयत)

या अपघातात प्रमोद उर्फ रणजीत बबन गायकवाड (वय ४५) व बाळासाहेब महादेव काळे (वय ४४, दोघे रा.चिचोंडी पाटील, ता.नगर) यांचा मृत्यू झाला आहे. तर रुग्णवाहिका मालक व चालक संदीप किसन चव्हाण (वय ३५, रा.चिचोंडी पाटील, ता.नगर) हे जखमी झाले आहेत. दोघे मयत हे संदीप चव्हाण यांच्या मालकीच्या मारुती इको कंपनीच्या रुग्णवाहिकेतून (एम एच ०१ पी ए ७५८२) नगरहून चिचोंडीकडे जात होते. मालक संदीप चव्हाण हे रुग्णवाहिका चालवत होते. टाकळी काझी गावच्या शिवारात असलेल्या जुन्या टोलनाक्याजवळ समोरून राजहंस दुध यांचा टँकर (क्र. एम एच १७ सी व्ही १५ ६९) भरधाव वेगात आला.

टँकरचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने तो रस्ता क्रॉस करत रुग्णवाहिकेला क्लीनर बाजूला येवून जोरात धडकला. त्यामुळे रुग्णवाहिकेत क्लीनर बाजूला बसलेले प्रमोद गायकवाड व बाळासाहेब काळे हे दोघे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी या जखमींना उपचारासाठी तातडीने नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे दुपारी उपचार सुरु असताना प्रमोद गायकवाड यांचा मृत्यू झाला तर बाळासाहेब काळे यांना खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे रात्री १२ च्या सुमारास उपचार सुरु असताना काळे यांचा ही मृत्यू झाला. या दोघांच्या मृतदेहाचे जिल्हा रुग्णालयात शव विच्छेदन करण्यात येवून त्यांच्यावर चिचोंडी पाटील गावात अंत्यसंस्कार करण्यात आले.





नगर जामखेड रोडवरील अपघात ग्रस्त वाहने.

मयत बाळासाहेब काळे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे. ग्रामपंचायत सदस्य संदीप काळे यांचे ते चुलत बंधु होत. तर मयत प्रमोद गायकवाड यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, २ मुले, भाऊ असा परिवार आहे. या अपघाताबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयतांच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल २ दशकापासून सर्वसामान्यांसाठी ठरतोयं 'आरोग्यदूत'

**डॉ. प्रवीण मुनोत यांचे प्रतिपादन; जनरल शस्त्रक्रिया शिबिरांतर्गत ८० रुग्णांची मोफत तपासणी; अल्पदरात केल्या जाणार विविध शस्त्रक्रिया**

नगर - मागील दोन दशकापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्वसामान्यांसाठी आरोग्यदूत ठरला आहे. खर्चिक व अद्यावत सर्व आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना एकाच छताखाली उपलब्ध झाली आहे. १०० बेड पासून दुमजली इमारतीपासून सुरू झालेला हा प्रवास बहुमजली इमारतीसह दुपटीने बेडची संख्या आणि अद्यावत ऑपरेशन थिएटरद्वारे सर्वसामान्यांना आरोग्य सेवा दिली जात असल्याचे प्रतिपादन जनरल सर्जन डॉ. प्रवीण मुनोत यांनी केले.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ. मुनोत

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित जनरल शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सेवा देणारे डॉ. मुनोत बोलत होते. याप्रसंगी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, अभय गुगळे, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, डॉ. विवेक भापकर आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. मुनोत म्हणाले की, आनंदऋषीजीचे ऑपरेशन थिएटर प्रशस्त, सुसज्ज व अद्यावत असून, एकाच वेळी ५ ऑपरेशन होऊ शकतात. यामध्ये हृदयरोग वेगळे असून, एन्जोप्लास्टीसाठी वेगळी कॅथलॅब उपलब्ध करण्यात आलेली आहे. दर महिन्याला मोठ्या प्रमाणात यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याचे स्पष्ट करुन, त्यांनी हॉस्पिटल स्थापनेपासूनचा सुसज्ज हॉस्पिटल पर्यंतचा अनुभव विशद केला.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहचविण्यासाठी दर महिन्याला दोन शिबिर घेण्यात येत आहे. स्थापनेपासून काही तज्ञ डॉक्टर या रुग्णसेवेशी जोडले गेले असून, त्यांचा प्रदीर्घ अनुभव रुग्णांना फायदेशीर ठरत आहे. अद्यावत आरोग्य सुविधा, कमी खर्चात शस्त्रक्रिया व तज्ञ डॉक्टर रुग्णांना नवजीवन देण्याचे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जनरल शस्त्रक्रिया शिबिरात डॉ. प्रवीण मुनोत व डॉ. विवेक भापकर यांनी ८० रुग्णांची तपासणी केली. गरजेनूसार रुग्णांवर अपेंडिक्स, इगवायनल हर्निया, हायड्रोसिल आदी जनरल शस्त्रक्रिया अल्पदरात केल्या जाणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# शीख धर्माचे पहिले 'शहीद', श्री गुरु अर्जुन देवजी तेरा किया मीठा लागे !! हर नाम पदार्थ नानक मांगे!

## गुरु अर्जुन देवजी यांची शहादत - सहनशीलतेचा अद्वितीय आदर्श



आजच्या गुरुपुरब निमित्ताने आपण शीख धर्माचे पाचवे गुरु श्री गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदीला विनम्र अभिवादन करतो. त्यांचे बलिदान मानवतेच्या इतिहासातील एक अमर अध्याय आहे.

मुगल सम्राट अकबर यांच्या निधनानंतर, त्यांचा मुलगा जहांगीर गादीवर आला. अकबरप्रमाणे सहिष्णुता न ठेवता, जहांगीरने धार्मिक सहनशीलतेऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. गुरु अर्जुन देवजी यांची वाढती लोकप्रियता, त्यांचा प्रभाव आणि सर्वधर्म समभावाचा संदेश जहांगीरला अस्वस्थ करत होता. तुजके-जहांगिरी या त्याच्या आत्मचरित्रातही याचा उल्लेख आहे.

जहांगीरने यासा व सियासत या निर्घृण कायद्यानुसार गुरु अर्जुन देवजींना शिक्षा दिली. या कायद्यानुसार, एखाद्याला रक्त सांडू न देता अत्यंत क्रूर पद्धतीने ठार मारले जाते. मे महिन्याच्या उष्णततेत, लाहोरमध्ये गुरुजींना गरम तव्यावर बसवले गेले आणि त्यांच्या अंगावर सतत उकळते पाणी व गरम वाळू टाकली गेली. या अत्याचारातून त्यांचे शरीर भाजले गेले. अखेरीस, त्यांना नदीत स्नानासाठी नेण्यात आले, जिथे रावी नदीत त्यांनी अंतिम विसावा घेतला.

जिथे गुरुजींनी शेवटची झलक दिली, त्या पवित्र स्थळी गुरुद्वारा डेरा साहिब (लाहोर, पाकिस्तान) आजही अस्तित्वात आहे. गुरुजींनी आपल्या अखेरच्या क्षणातही परमेश्वराचे आभार मानले आणि तेरा किया मीठा लागे असे उच्चारले - हा शुद्ध समर्पणाचा आणि अध्यात्मिक स्थैर्याचा संदेश आजही भाविकांना प्रेरणा देतो.

गुरुजींच्या शहादतीच्या स्मरणार्थ, दरवर्षी मे-जून महिन्यात 'छबील' लावली जाते, ज्यामध्ये लोकांना थंड शरबत वाटले जाते. हे शरबत उष्णतेत थंडावा तर देतोच, परंतु त्यामागील भावनात्मक श्रद्धांजलीही लोकांच्या मनात जागृत करतो. गुरु अर्जुन देवजींनी जीवनभर शांतता, सहिष्णुता आणि सेवा यांचा संदेश दिला. त्यांचे बलिदान केवळ शीख समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श आहे.

- **हरजीतसिंग वधवा**, मो. ९४२३१६२७२७.
गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान

# डॉ. कल्याणी बडे यांना नवी दिल्लीत भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट पुरस्कार

नगर - अहिल्यानगरच्या ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ डॉ. कल्याणी बडे यांना एमर्जिंग अचिव्हर्स अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे झालेल्या या सन्मान सोहळ्यात डॉ. बडे यांना गौरविण्यात आले.



डॉ. कल्याणी बडे यांना नवी दिल्लीत भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी डॉ. कल्याणी बडे यांनी हा पुरस्कार माझ्या आयुष्यातील सर्व पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींचा आहे. माझी आई सरोजिनी नागरगोजे आणि वडील डॉ. प्रल्हाद नागरगोजे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानते. माझे पती रुशिकेश बडे आणि माझा मुलगा अवनीश बडे यांची मोठी साथ लाभली. मोठी बहीण डॉ. स्वप्नाली आणि भाची आस्था यांनी नेहमीच प्रेरणा दिली आहे. त्यांच्या प्रेमामुळे आणि पाठिंब्यामुळेच मी या टप्प्यावर पोहोचले आहे. तसेच, माझे मित्र परिवार आणि सहकारी यांनी प्रत्येक क्षणी माझा विश्वास वाढवला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डॉ. कल्याणी बडे यांनी न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथून जैवतंत्रज्ञानात पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. सध्या त्या अपोलो फर्टिलिटी सेंटर, मुंबई येथे ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत आणि वंध्यत्व उपचाराच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे.

डॉ. कल्याणी बडे यांचा प्रवास हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी विशेषतः आरोग्य व विज्ञान क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो.

# आनंदधाम, नगर येथे १ जून रोजी विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर गाईडन्स

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा**



नगर - शिक्षणाची शिदोरी ही आर्थिक, मानसिक स्तरावर व्यक्तिगत व सामाजिक विकास वर्धनासाठी अनन्य साधारण महत्वाची आहे. १० वीं व १२ वीं, हा शिक्षणाचा मूलभूत पाया आहे. या दृष्टीने १० वीं व १२ वीं परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी - विद्यार्थीनींचा सत्कार करुन त्यांना तसेच इतर विद्यार्थी - विद्यार्थीनींना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले जाते. तसेच त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या उज्वल भविष्य घडण्यास मदत होते.

१ जून रोजी आनंदधाम, अहिल्यानगर येथे १० वीं व १२ वीं परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त सकल जैन विद्यार्थी - विद्यार्थीनींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवी व्यक्तिमत्त्व, तज्ञ सल्लागार, गेली २५ वर्षे भारतीय जैन संघटना द्वारा करिअर गाईडन्स करणारे हेमचंद्र शिंदे सर यांचा सकल जैन विद्यार्थी - विद्यार्थीनी, पालकांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी १० वीं व १२ वीं परीक्षेत ८० % पेक्षा अधिक मार्क्स मिळालेल्या विद्यार्थ्यी - विद्यार्थीनींनी आपले नाव, मोबाईल नंबर व मार्कशीट ची झेरॉक्स खाली दिलेल्या नंबर वर ३० मे संध्याकाळी ७ वाजेपर्यंत पाठवावे. ७५८६९३७९९९, ८४४६९२५४३०, ७४०६८६५६९४

या कार्यक्रमासाठी १० वीं व १२ वीं परीक्षेत उत्तीर्ण सकल जैन समाजाच्या विद्यार्थी - विद्यार्थीनी, पालक यांनी उपस्थित राहून गुणवत्ता प्राप्त गुणवंतांना प्रोत्साहित करावे व हेमचंद्र शिंदे सरांच्या उपयुक्त मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ, श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, महावीर सेना, आनंदधाम, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अक्षय पावडे व पुनम बेलसरे योगासन पंच परीक्षा उत्तीर्ण



नगर - बृहन महाराष्ट्र योग परिषद व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या योगासन या क्रीडा प्रकाराच्या पंच परीक्षेत शहरातील श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित एम.एम.वाय.टी.सी. क्लबचे योग प्रशिक्षक अक्षय पावडे व पुनम बेलसरे हे उत्तीर्ण झाले.

चिखलदरा येथे सदर योगासन पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही प्रशिक्षक गेल्या दोन वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करत आहेत. त्यांच्या माध्यमातून योगाचा प्रचार प्रसार सुरु आहे. प्रशिक्षकांनी मिळवलेल्या यशाबद्दल ट्रस्टचे विश्वस्त मोहन मानधना यांनी अभिनंदन केले. क्लबचे प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाढाणे, अक्षता गुंड पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पावडे व बेलसरे प्रशिक्षणाचे कार्य करत आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्लबच्या सर्व खेळाडूंनी तसेच पालकांनी देखील अभिनंदन केले आहे.





भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत १० दिवसीय बौद्धाचार्य श्रामनेर शिबिराचे आयु. नितीन शिवाजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले.

# भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे शुभारंभ

नगर - भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अंतर्गत नगर तालुक्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक न्यू टिळक रोड अहिल्यानगर या ठिकाणी जिल्हा शाखा, शहर शाखा व तालुका शाखेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत १० दिवसीय बौद्धाचार्य श्रामनेर शिबिराचे नगर तालुका अध्यक्ष आयु. नितीन शिवाजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरार्थींना चिवरदान करून त्रिशरण पंचशील देताना राष्ट्रीय सचिव भिख्खू महासंघचे भंते ए. सुमेधबोधि, केंद्रीय शिक्षक ए. जी. तायडे गुरुजी, जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, सरचिटणीस सतीश ओहोळ, कोषाध्यक्ष विजय हूसळे, उपाध्यक्ष भगवंत गायकवाड, उपाध्यक्ष संतोष गायकवाड, जिल्हा प्रभारी धोंडीबा राक्षे, राहुल कांबळे, केंद्रीय शिक्षक अण्णा गायकवाड, सचिव गोरख केदारे, सचिव किशोर कांबळे, नगर शहराध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे, सरचिटणीस गौतम पाचरणे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, उपाध्यक्ष लक्ष्मण माघाडे, अरुण गायकवाड, प्रकाश कांबळे, बाबासाहेब धीवर, विशाल गायकवाड, संजय केदारे, सुनील पंचमुख, संतोष जाधव, सुनील गायकवाड, सावित्रा हाबू, संतोष गायकवाड, मिलिंद आंग्रे, विजीत ठोबे आदीसह जिल्हा व शहर कार्यकारणी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये पुढील १० दिवस शिबिर होत आहे. सर्व कार्यकारिणी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ गतिमान करणे व बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट सफल करण्याचे कार्य तालुका पदाधिकारी करत असुन अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यात नगर तालुक्याने राबवलेले शिबिर अत्यंत उल्लेखनीय पद्धतीने होत आहे. शिबिर यशस्वी करण्याकरिता सर्वच पदाधिकारी यांचा प्रयत्नांना यश म्हणून २३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला आहे. या शिबिराचे अहिल्यानगर जिल्ह्यातून सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

शिबिर यशस्वी करणे करिता नगर तालुका अध्यक्ष नितीन शिवाजी साळवे, सरचिटणीस अविनाश धोंडेबा राक्षे, कोषाध्यक्ष सुभाष भीमराव कांबळे, पर्यटन सचिव गौतम हंबर्डे, कार्यालयीन सचिव सनी रखमाजी गायकवाड, संस्कार उपाध्यक्ष विशाल पवार, संस्कार सचिव व पर्यटन विभागाचे अंकुश मोहन गायकवाड, समता सैनिक उपाध्यक्ष अमोल नाथा गायकवाड, समता सैनिक सचिव परमेश्वर भागिनाथ गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# आजारांची संख्या वाढत असल्याने मोफत शिबिरांची अत्यंत आवश्यकता

**डॉ.अशपाक पटेल यांचे प्रतिपादन; पटेल क्लिनिक व अल करम हॉस्पिटलतर्फे मोफत थायरॉईड व युरीक अॅसिड तपासणी शिबिर**

नगर - देशात गरजूंची संख्या मोठी आहे. त्या प्रमाणात सामाजिक उपक्रमांची कमतरता आहे. आपल्याकडे रोज काही ना काही दिवस साजरे केले जातात. अशावेळी समाजाच्या गरजा ओळखून त्या दिवसांना ते गरजूंना गरज असलेले उपक्रम राबविले पाहिजेत, असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशपाक पटेल यांनी केले.




पटेल क्लिनिक व अल करम हॉस्पिटलतर्फे मोफत थायरॉईड व युरीक अॅसिड तपासणी शिबिर घेण्यात आले.

पटेल स्पेशालिटी क्लिनिक व अलकरम हॉस्पिटल तर्फे अहमदनगर शहराच्या स्थापना दिनानिमित्त मोफत थॉयरॉईड, युरिक अॅसिड तपासणी, सर्वरोग तपासणी, डोळे तपासणी सहुलतीत रक्त लघवी तपासणी, एक्स-रे, सोनोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. अशपाक पटेल, डॉ. जहीर मुजावर, मखदूम एज्युकेशन अॅण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, अल करम सोसायटीचे तौफिक तांबोली, शेरअली शेख आदी उपस्थित होते.

डॉ. पटेल म्हणाले की संपूर्ण जगात भारतच एकमेव असा देश आहे जिथे वेगवेगळ्या धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. हाच या देशाचा खरा गौरव असून, याच ओळखीने भारत अख्ख्या जगात ओळखला जातो. अशा देशात रोज काही न काही सण उत्सव साजरे करताना समाजाच्या हिताचे उपक्रम राबविल्यास गरजूंच्या गरजांना हातभार लागेल. प्रास्ताविक आबीद खान यांनी केले. सुत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. तौफिक तांबोली यांनी आभार मानले.

# जर्नालिस्ट कौन्सिल ऑफ इंडियाचा प्रा. जवाहर मुथा यांना पुरस्कार

नगर - ३० मे हा दिवस हिंदी पत्रकार दिन म्हणून भारतात ओळखला जातो. जर्नलिस्ट कौन्सिल ऑफ इंडिया (नोंदणीकृत) या अखिल भारतीय पत्रकार परिषदेने प्रा. जवाहर मुथा यांना या वर्षी डिजिटल प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.



प्रा.मुथा यांनी महाराष्ट्र हिंदी पत्रकार संघटना १९९५ मध्ये स्थापन केली होती. त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दहा वर्षे कार्य केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठात ते संशोधन संपादक होते. कृषी पत्रकारितेचा अभ्यासक्रम त्यांनी आपल्या सेवेच्या काळात सुरू केला होता. किर्लोस्कर मासिकांचे ते सहसंपादक होते. इल्नाचे (इंडियन लॅग्वेजेस न्यूज पेपर्स असोसिएशन) जनरल सेक्रेटरी ते होते. त्याशिवाय ज्योतिष पत्रिका, साप्ताहिक नगर संकेत, मिलिंद, या वृत्तपत्रांना स्थापन करून त्यांनी मार्गदर्शन केले आहे. आज ही वयाच्या ८५ व्या वयात ते लेखन कार्य करीत असतात. पुणे विद्यापीठात त्यांच्या पत्रकारिता व साहित्यविषयक कार्यावर संशोधन ही झाले आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने त्यांना बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार देऊन गौरवले आहे. जर्नालिस्ट कौंसिल ऑफ इंडिया या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनुराग सक्सेना यांनी ३० मे रोजी हिंदी पत्रकारिता दिनानिमित्त प्रा. जवाहर मुथा यांना डिजिटल प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

# शहराच्या स्थापना दिनानिमित्त ३१ मे व ८ जून रोजी सरगम गीतमालातर्फे अहिल्यानगरमध्ये गारवा मराठी सदाबहार गीतांच्या २ मैफिलींचे आयोजन

नगर - अहमदनगर शहराच्या ५३५ वा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन, मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा आणि अहिल्यादेवी होळकर जयंती असा चतुष्कोनी संगम साधून महेश घावटे यांनी नगरकर रसिकांसाठी २ मराठी सदाबहार गीतांच्या मैफिलीचे आयोजन केलेले आहे.

गारवा भाग-१ शनिवार ३१ मे रोजी सायंकाळी ५.३० वा कोहिनूर मंगल कार्यालय येथे आणि गारवा भाग-२ रविवार ८ जून रोजी रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे या कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

सादर होणाऱ्या कार्यक्रमात नवीन आणि जुने अश्या जवळपास ३२ गायक-गायिकांनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका गायत्री जोशी या करणार आहेत. शहर परिसरातील नवोदित गायक गायिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि कार्यक्रमाच्या माध्यमातून नवनवीन कलाकारांची शृंखला तयार करण्याचे कार्य महेश घावटे गेल्या २ वर्षांपासून अखंडीतपणे करत आलेले आहेत.

इच्छुक कलाकारांची संख्या पाहता हा कार्यक्रम एकूण दोन भागात घेण्यात येणार आहे.

गारवा भाग-१ शनिवार दि ३१ मे रोजी सायंकाळी ५.३० वा कोहिनूर मंगल कार्यालय या ठिकाणी तसेच गारवा भाग-२ रविवार ८ जून रोजी सायंकाळी ५.३० वा रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे होणार आहे.

मी रात टाकली, ढोलकीच्या तालावर पासून गालावर खळी, कांदेपोहे पर्यंत वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या धाटणीची, भक्तिगीते, भावगीते, लावणी इ मराठी गाणी या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत.

ही गाणी सादर करण्यासाठी महेश घावटे, हेमंत नरसाळे, डॉ.विवेकानंद कंगे, प्रशांत बंडगर, विजय आंग्रे, सुनील भंडारी, अजित रोकडे, दिनेश मंजरतकर, सुनील महाजन, रोनीत सुखधान, भानुदास महानूर, राजकुमार सहदेव, यशवंत आंबेकर, सूर्यकांत थीगळे, सुशील देठे, अजय आदमाने, चारुदत्त ससाणे, जीवन महाजन, मुख्तार शेख, राजेंद्र शहाणे, संजय भिंगारदिवे, श्रीशैल शिवगुंडे यांच्यासह मोनाली बोरुडे, प्रा.सारिका रघुवंशी, प्रा.दीपा भालेराव, पूनम कदम, नीता माने, रत्ना शिरसाळकर, ज्योती अडाणे, डॉ.कल्पना ठुबे, लाटे मॅडम, सुनीता धर्माधिकारी आदी कलाकार सहभागी होणार आहेत. शहरातील मूळव्याधतज्ञ संगीतप्रेमी डॉ.दमण काशीद आणि डॉ.गायत्री कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय सुफी गायक पवन नाईक, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नितीन जगताप, सचिन चंदनशिव, इंजि. अभिजीत गायकवाड, इंजि.निलेश महाजन, अॅड. रवींद्र शितोळे, महावितरण सावेडी विभाग प्रमुख अभियंता जगन्नाथ बारगळ आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

नगरकर रसिकांसाठी मराठी गाण्यांचे हे दोन कार्यक्रम एक मोठी पर्वणी असून संगीतप्रेमींनी कार्यक्रमास उपस्थित राहून मराठी गीतांचा आस्वाद घ्यावा. हा कार्यक्रम विनामूल्य असून वेळेवर सुरू होईल अशी माहिती संयोजक महेश घावटे यांनी दिली.

# जागतिक योग दिनानिमित्त योग विद्याधाम तर्फे १ जूनपासून विशेष योग वर्ग

नगर - जागतिक योग दिनानिमित योग विद्या धाम अहमदनगर या संस्थेतर्फे १ जूनपासून शासकीय प्रोटोकॉलसह योगासनांचा विशेष योग वर्ग घेण्यात येणार आहेत.सदर वर्ग हे शहरातील निरनिराळ्या भागांमध्ये घेण्यात येणार आहेत अशी माहिती योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

हे वर्ग योग भवन सावेडी व सिध्दबाग, गुलमोहर रोडवरील नवले हॉल येथे होणार आहेत. तसेच ज्यांना आपल्या मोहल्यात योग वर्ग व्हावा असे वाटते त्यांनी हॉल उपलब्ध करून दिल्यास संस्थेतर्फे योग शिक्षकाची योजना करण्यात येईल. अशी माहिती कार्याध्यक्ष जयंत वेसीकर यांनी दिली. जागतिक योग दिनानिमित फक्त एक दिवस योग वर्ग नगर घेता सलग ४० दिवस योगाचे वर्ग घेतले जाणार आहेत. त्यामुळे लोकांना योगाची आवड निर्माण होईल व त्यामुळे नियमित योगाभ्यास केला जाईल.

याचा लाभ घ्यावा असे आवाहन योग शिक्षक अनिरुद्ध भागवत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२४१ २४२१२५५ या नंबरवर संपर्क साधावा

# भारत कायम विश्वाच्या कल्याणासाठी प्रयत्नशील

### शिक्षणतज्ज्ञ मुकुल कानिटकर यांचे प्रतिपादन




विचार भारतीच्या ग.म.मुळे व्याख्यानमालेत विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ मुकुल कानिटकर यांनी स्व बोध विषयावर गुंफले.

### ग.न.मुळे स्मृती व्याख्यानमालेचे चतुर्थ पुष्प

नगर – पूर्ण जगात वैचारीक शोध होत आहे. २१ व्या युगात सर्वात मोठा संघर्ष स्व बोधचा होत आहे. सर्व विश्व प्रत्येक देश आपलेच विचार सर्वोत्तम असल्याचे जगात ठणकावत आहे. त्यामुळे करोडोंचे रक्त सांडले आहे. यात काही शक्तिशाली देशांचे, इस्लामी व कम्युनिझम विचारांचा अधिक समावेश आहे. त्यामुळे पूर्ण जगात अशांतता पसरली आहे. भारत अनादी अनंत काळापासून पूर्ण जगाला सांगत आला आहे की विविधताही विश्वाचा मूलमंत्र आहे. त्यामुळे दुसऱ्याला माझ्यासारखे बनवण्याची गरज नाही. संत ज्ञानेश्वर माउलींही परब्रह्माकडे पसायदान मागताना जो जे वांछील तो ते लाहो व विश्व स्वधर्म सूर्ये पाहो हे सर्वात मोठे मागणे मागून जगाचे कल्याण केले आहे. हा भारताचे मूलमंत्र आहे. भारत कायम विश्वाच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असल्याने हे भारताचे विश्वबंधुत्व आहे. त्यामुळेच भारत आपल्या संस्कृतीचा पूर्ण जगात प्रसार करत आहे, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ मुकुल कानिटकर यांनी केले.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेत चतुर्थ पुष्प मुकुल कानिटकर यांनी स्व बोध या विषयावर गुंफले. यावेळी प्रमुख पाहुणे मोहटादेवी देवस्थानचे माजी विश्वस्त अ‍ॅड.रमेश वाकळे, जनकल्याण रक्तकेंद्राचे कोषाध्यक्ष अनिल धोकरीया, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

कानिटकर पुढे म्हणाले, स्वामी विवेकानंद यांनी आंतरराष्ट्रीय सभेत सांगितल्याप्रमाणे प्रत्येक राष्ट्राचे एक व्रत आहे. त्यावरच ते चालले पाहिजे. संदेश, नियती व व्रत या तिघांना मिळवून राष्ट्राचा स्वधर्म बनतो. हे त्यांनी सांगितले. भारताचा धर्म स्व बोध आहे. हा स्व बोध जागृत होण्यासाठी भाषा, भूषा, भजन, भोजन, भवन, भ्रमण या सहा गोष्टींमध्ये स्वचे आचरणास प्रारंभ करून स्व बोधला जीवनात आचरणात आणा तेव्हाच सर्वांचे धर्म ब पुरुषत्व जागृत होईल.

यावेळी रवींद्र मुळे यांनी रा.स्व.संघाचे जुन्या काळातील स्वयंसेवक ग.म.मुळे यांच्या कार्याची माहिती दिली. मिलिंद कुलकर्णी यांनी परिचय दिला. सुधीर लांडगे यांनी आभार मानले. यावेळी डॉ.विक्रम दीडवानी, कमलेश भंडारी, महेंद्र चंदे, राजेंद्र तागड, बाबासाहेब वाकळे आदी उपस्थित होते.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा १० वीचा निकाल १००%



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमधील १० वी च्या परिक्षेतील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.

नगर – अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्रजी स्कूलचा १० वीच्या परिक्षेचा निकाल १०० % लागला. स्कूलमधील २२ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९०% गुण पटकावले. ७५ ते ९० % गुण मिळवणारे ४८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीचे यश २० विद्यार्थ्यांनी पटकावले.

पलक राहुल पटणी हिने ९७% गुण घेऊन स्कूलमध्ये प्रथम क्रमांक, आर्य मोहन शेटे याने ९६.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, रिद्धी चंद्रशेखर भुसा व अनुषा सावता गायकवाड या दोघींनी ९६.४०% गुण मिळवून तिसरा क्रमांक, पलक राजेश पुरसावानी आणि श्रीनिवास सतीश कोंड्याल यांनी ९६% गुण मिळवत चौथा क्रमांक तर रागिणी परिमल महाजन हिने ९५.८० % गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकावला. विषयानुसारचे टॉपर्स – पलक पटनी (इंग्रजी ९५, हिंदी ९३), रिद्धी भूसा व आर्य शेटे (हिंदी ९३), रिद्धी भूसा व रागिनी महाजन (मराठी ९२), सुमेध झोटिंग (गणित ९८), अनुषा गायकवाड, पलक पटणी, रिद्धी भूसा, रागिनी महाजन (विज्ञान ९९), पलक पटनी (समाजशास्त्र ९९ ), सिंधी समाजातील टॉपर (मुली), पलक राजेश पुरसवानी ९६%, सिंधी समाजातील टॉपर (मुलगा), गौरव पितांबर चुग ९३.२०%

अध्यक्ष रामचंद मेंघानी यांनी सर्व एसएससी टॉपर तसेच परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि याचे श्रेय त्यांनी पूर्व–प्राथमिक ते हायस्कूलपर्यंतच्या सर्व शिक्षकांना दिले.ते म्हणाले की, हे एक टीमवर्क आहे. भविष्यातही आमची शाळा उत्कृष्ट कामगिरी करणार आहे आणि विद्यार्थी त्यांची उंची गाठणार आहेत.

मुख्याध्यापिका गीता तांबे यांनी सांगितले की, १२ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शाळेला अभिमान वाटावा असे गुण संपादन केले आहेत. विज्ञान विषयामध्ये त्यांनी ४० पैकी ४० गुण मिळवले.

मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुकही केले.

मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर आणि आंतरिक भविष्यासाठी मार्गदर्शन केले.

डॉ.राहुल पटणी यांनी शिक्षकांचे कौतुक करत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी केलेल्या मेहनतीची प्रशंसा केली.

ज्योती कराळे म्हणाल्या, या यशाचे श्रेय सर्वप्रथम शाळेला, त्यांच्या मुलीला, शाळेतील शिक्षकांना, विषय शिक्षकांना जाते. त्यांनी शाळा व्यवस्थापनाचे आभार मानले.

दहावीच्या शिक्षकांचे त्यांच्या प्रयत्नांबद्दल सत्कार करण्यात आले. मुलांना स्मृतिचिन्ह आणि मिठाई देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी कोषाध्यक्ष दामोदर माखीजा, विश्वस्त महेश माध्यम, राजकुमार गुरनानी, सुरेश हिरानंदानी, हरेश माध्यम, प्राचार्य गीता तांबे, गोदावरी कीर्तानी आणि कांचन पापडेजा, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सूत्रसंचलन शिरीन शेख यांनी केले.

# श्री लक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्थेस दिलेला चेक न वटल्याने ८० हजाराचा दंड व १ महिने कारावास

नगर – श्री लक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर या पतसंस्थेकडून अतुल शांताराम भोसले यांनी व्यवसाय वाढीसाठी ५० हजार रुपये कर्ज घेतले होते व सदरचे कर्ज १५ महिन्यामध्ये परत फेडण्याची हमी दिली होती, परंतु त्यांनी नियमित कर्ज न फेडल्यामुळे सदर कर्जास असलेले जामिनदार भाऊसाहेब छगन गोरे यांनी फिर्यादी पतसंस्थेत २० फेब्रुवारी २०२० रोजी ५३,५११ रुपयांचा इंडियन बँक, शाखा सर्जेपुरा या बँकेचा चेक दिला व सदरचा चेक निश्चित वटेल, असा विश्वास व भरवसा दिला. परंतु आरोपीचे खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने सदरचा चेक न वटता परत आला, त्यामुळे आरोपीविरुद्ध पतसंस्थेने निगोशिएबल इन्स्ट्रमेंट अ‍ॅक्ट कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या केसची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांचेसमोर होवून कोर्टाने आरोपी भाऊसाहेब छगन गोरे यास ८० हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा तसेच सदरचा द्रव्यदंड न भरल्यास एक महिना कारावासाची शिक्षा सुनावली.

याकामी फिर्यादी पतसंस्था यांच्यावतीने माहितगाव इसम म्हणून सुहास त्रिंबक मोहोरकर, अ‍ॅड. राजू भास्कर गाली, अहमदनगर यांनी काम पाहिले.



चौंडी येथे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांना राजकीय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स इंग्लंडच्या वतीने ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स इंग्लंडचे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते ऑनर सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या भोगवटा वर्ग–२ प्रकारातील मिळकतीमध्ये विद्यमान मालक यांचा कायदेशीर हक्क व हिस्सा असून, विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष मालकीहक्कात व कब्जे वहिवाटीत मिळकत क्षेत्र असून इतर अधिकारात भोगवटा वर्ग–२ हा शेरा आहे. नमूद मिळकतीमध्ये असलेल्या विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या संपूर्ण हिश्याची कायदेशीर व प्रशासकीय परवानगी अंती विक्री करण्याची बोली विद्यमान मालक, त्यांचे कुटुंबिय आणि कायदेशीर वालीवारस व आमच्या अशिलात झालेली असून नमूद मिळकत क्षेत्र कायदेशीर परवानगीने कायमखुष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की विद्यमान मालक यांच्या मालकी हक्कात असलेल्या भोगवटादार वर्ग– २ प्रकारातील मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणा समोर वाद चालु असल्यास अथवा कोणाही त्रयस्थ इसमासमवेत विद्यमान मालक यांनी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र नोंदणीकृत व निष्पादीत केले असल्यास आणि विद्यमान मालक यांच्या मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणाचा हस्तांतर करणेकामी तुर्तातुर्त अथवा निरंतर मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर **संपुर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे.** यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहिर नोटीसीस केवळ वर्तमान पत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राहय धरता येणार नाही. विहित **७ दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या समवेत कायदेशीर रजिस्टर दस्तांन्वये विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या मिळकत क्षेत्राचा कायदेशीर प्रशासकीय परवानगी घेऊन हस्तांतरणाच्या दस्ताचा व्यवहार पूर्ण करतील** तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णनः–** डि. अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **वाकोडी** येथील मे.दु.निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै |
|---|---|---|
| १७५ | १.७७ | ५.७५ |
| यापैकी विद्यमान मालक यांच्या संबंधातील अविभाज्य हिश्याची व कायदेशीरपणे मालकी हक्कात येणाऱ्या संपूर्ण शेतजमीन मिळकत याचे क्षेत्र ० हे. ५९ आर मिळकतीबाबत. **यांसी चतु:सिमा- महसुल रेकॉर्डप्रमाणे व असलेल्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीप्रमाणे** | | |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक शेतजमिन मिळकत यातील तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कांसह व सामाईक जाणे–येणेचा रस्ता हिस्सेनुरुप सामाईक हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक - रजिस्टर ऑलिस्टर भोसले**
आधार नं. ८५४७ ७१८७ ५२७०
रा. मु.पो. वाकोडी,
ता.जि. अहमदनगर
दि. ३०/०५/२०२५.

**अ‍ॅड. संदिप दादासाहेब पाखरे**
(बी.ए.एलएल.बी.)
नोटरी पब्लिक, भारत सरकार.
**अ‍ॅड. सौ. श्रुती संदिप पाखरे**
(बी.ए.एलएल.एम.)
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास, बालिकाश्रम जवळ, अहमदनगर मो. नं. ९८५०१८१७१७



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालक स्वतंत्र कायदेशीर हक्क व हिस्सा असून, विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष मालकीहक्कात व कब्जे वहिवाटीत मिळकत क्षेत्र आहे. नमूद मिळकतीमध्ये असलेल्या विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या संपूर्ण हिश्याची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक, त्यांचे कुटुंबिय आणि कायदेशीर वालीवारस व आमच्या अशिलात झालेली असून नमूद मिळकत क्षेत्र कायमखुष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की विद्यमान मालक यांच्या मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणा समोर वाद चालु असल्यास अथवा कोणाही त्रयस्थ इसमासमवेत विद्यमान मालक यांनी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र नोंदणीकृत व निष्पादीत केले असल्यास आणि विद्यमान मालक यांच्या मिळकत क्षेत्राबाबत कोणत्याही न्यायाधिकरणाचा हस्तांतर करणेकामी तुर्तातुर्त अथवा निरंतर मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१५ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर **संपुर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे.** यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहिर नोटीसीस केवळ वर्तमान पत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राहय धरता येणार नाही. विहित **१५ दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालक यांच्या समवेत कायदेशीर रजिस्टर खरेदीखत दस्तांन्वये विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या मिळकत क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील.** तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णनः–** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **अहिल्यानगर शहर** येथील **मोची गल्ली** भागातील दुकान मिळकत खालीलप्रमाणे.

| अ) सिटी सर्व्हे नंबर | | क्षेत्रफळ | |
|---|---|---|---|
| २७३२/४ | | १९३.४२ | |
| ही संपूर्ण लिहून देणार यांच्या मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची जागा त्यावरील संपूर्ण टि–अ‍ॅगल व पत्रा इमारतीचे बांधकाम क्षेत्र ३८४.४० चौ.मी. बांधकामासह मिळकत. | | | |
| यांसी चतु : सिमा | | | |
| पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| सि.स.नं. २७३२ पैकी | सि.स.नं.२७३२/१४ मिशन कंपाऊंड, | सि.स.नं.२७३२/२, २७३२/३, | लागु रस्ता, |

| ब) सिटी सर्व्हे नंबर | | क्षेत्रफळ | |
|---|---|---|---|
| २७३२/५ | | १६.७ | |
| ही संपूर्ण लिहून देणार यांच्या मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची जागा त्यावरील संपूर्ण टि–अँगल इमारतीचे बांधकाम क्षेत्र ३२.९४ चौ.मी. बांधकामासह मिळकत. | | | |
| यांसी चतु : सिमा | | | |
| पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| सि.स.नं. २७३२/६ | सि.स.नं. २७३२/४ | लागू सि.स.नं. | लागु रस्ता, |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत व यातील तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कांसह व सामाईक जाणे–येणेचा रस्ता हिस्सेनुरुप सामाईक हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक - श्री. अभिमन्यु लक्ष्मण जाधव**
रा.घर नं.६८४०,
जंगुभाई तालीम जवळ,
तोफखाना, अहिल्यानगर.
दि. ३०/०५/२०२५.

**अ‍ॅड. संदिप दादासाहेब पाखरे**
(बी.ए.एलएल.बी.)
नोटरी पब्लिक, भारत सरकार.
**अ‍ॅड. सौ. श्रुती संदिप पाखरे**
(बी.ए.एलएल.एम.)
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास, बालिकाश्रम जवळ, अहमदनगर मो. नं. ९८५०१८१७१७


## अहिल्यानगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

जा.क्र. ०५६३ दिनांक २९/०५/२०२५

## –: जाहीर नोटीस :–

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील विषेशकरून शहर गावठाण भागातील जुन्या, इमारती पैकी काही इमारती धोकेदायक/मोडकळीस आले बाबत मनपाकडे प्राप्त तक्रारी नुसार प्रत्यक्ष पहाणी करुन, निरिक्षण करून शासनाचे नगरविकास विभागाचे दि. ५ नोव्हेंबर २०१५ शासन परीपत्रक नुसार सी–१) प्रकार म्हणजे अतिधोकादायक इमारत मनुष्य रहिवास करण्यास अयोग्य असुन तात्काळ निष्कसित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या प्रकारातील इमारती या विभागाने वेळोवेळी व नुकतेच सा.बा. वि.जा. क्र.५१३ दि. २६/०५/२०२५ रोजीचे नोटीस अन्वये संबधित जागामालक, भोगवटादार यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६४ अन्वये यापूर्वी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत, नोटीस देउन ७ दिवसाचे आत धोकादायक भाग उतरुन घेणे बाबत कळविले होते परंतु संबधितानी सदर नोटीस प्रमाणे कार्यवाही करुन नोटीसची अमंलबजावणी केल्याचे आढळून येत नाही.

तसेच सदर मिळकती बाबत कोणतेही मा. न्यायालयाचा स्थगिती आदेश, जैसे थे आदेश व धोकादायक इमारत न पाडणे बाबत आदेश सद्यस्थितीत अस्तित्वात असल्यास तो शहर अभियंता अहिल्यानगर महानगरपालिका यांच्याकडे तात्काळ सादर करावा, अन्यथा मा. न्यायालयाचे कोणतेही आदेश नाहीत असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्या पावसाळा सुरू असल्याने नागरिकांचे, रहिवाशांचे, रस्त्यावरून ये जा करणारे नागरिकांचे जिवीत व वित्त हानी होउ नये या करीता सदर धोकादायक इमारती उतरविण्याची कार्यवाही करण्यात येणार असून या कामी येणारा सर्व प्रकाराचा खर्च संबधितांकडून वसूल करण्यात येईल व खर्च ७ दिवसात न भरल्यास दंड आकारून संबधीत करामध्ये अधिक्य करण्यात येईल याची सर्व संबधितांनी नोंद घेवून अहिल्यानगर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सोबत–: इमारतीची यादी ०१ ते १५

**शहर अभियंता**
अहिल्यानगर महानगरपालिका

| अ.नं. | घरमालक / भोगवटदार | पत्ता |
|---|---|---|
| १ | श्री सचिन जुगराज डागा | घ.नं. ३४०७ सि.स.नं. ३९२७<br>माणकेश्वर गल्ली, जुना बाजार रोड |
| २ | श्री अमित लक्ष्मण काळे | घ. नं. ४०७/८ सि.स.नं. सातभाई गल्ली,<br>तोफखाना |
| ३ | घ–श्री चंदनमल मुळचंद भळगट (कुंभळीकर)<br>भो– सौ. सुनिता संतिष सोमाणी | घ.नं.८९६ सि.स.नं. ६८७ शेरकर गल्ली,<br>सर्जेपुरा |
| ४ | घ– श्री. भुपेंद्र नंदकुमार रासने<br>भो– श्री सुनिल मानकर | घ.नं.८०१ सि.स.नं. ३९१/अ२<br>नेता सुभाष चौक, चितळे रोड |
| ५ | श्री शंकर व्यंकय्या शिरसुल<br>श्री. गणेश व व्यंकटेश लक्ष्मण शिरसुल | घ.नं. ७८४ सि.स.नं. ४८१ माळयाची चावडी,<br>तोफखाना |
| ६ | भिकचंद प्रेमचंद व्यास | घ.नं. ४०५४ सि.स.नं. ५५९५ महाजन गल्ली,<br>मैदान आड |
| ७ | काळूराम रविंद्र घटमाळ, सुरेश रा. घटमाळ,<br>रमेश रा. घटमाळ | घ.नं. सि.स.नं. ४४५८ / अबक<br>ढोर गल्ली, माळीवाडा |
| ८ | श्री विद्याधर रामचंद्र देशमुख<br>श्री. पद्मजा संजय धोपावकर | घ.नं. ३८११ सि.स.नं.<br>घुमरे गल्ली, देशमुख वाडा |
| ९ | सुभाष उत्तमचंद लुणावत | घ.नं. सि.स.नं. मानकर गल्ली |
| १० | दिलीप उध्दवराव कुक्कडवाल<br>अरविंद यादवराव कुक्कडवाल<br>सतिष उध्दवराव कुक्कडवाल<br>चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल | प्लॉट नं. ३६ सि.स.नं. ७५८१<br>सर्जेपुरा चौक |
| ११ | विठ्ठल मंदिर पंच मंडळ | घ. नं. ४५६२ सि.स.न. ४८३४<br>झारेकर गल्ली |
| १२ | घरमालक –<br>सुवालाल आनंदराव गुंदेचा (मयत) – वारसदार<br>१) संजय सुवालाल गुंदेचा २) श्री. मनोज सुवालाल गुंदेचा व इतर<br>भोगवटादार–<br>१) सदाबाई मोहनलाल बोरा (मयत) वारसदार – नितीन कांतीलाल मुनोत (पोटभाडेकरी )<br>२) कुंदनमल भागचंद कासवा (मयत) दिपक कुंदनमल कासवा<br>३) पेमराज खिवराज गुंदेचा (मयत) विजय पेमराज गुंदेचा’<br>४) गोटीराम प्रतापमल लखारा (मयत) वारसदार – हिरालाल गोटीराम लखारा (पोटभाडेकरी) सत्यनारायण गोपाल चौहान (पोटभाडेकरी )<br>५) गंगाधर रंगनाथ भुमकर (मयत) राजेंद्र गंगाराम भुमकर<br>६) भानुदास बाळाजी काकडे (मयत) प्रकाश भानुदास काकडे<br>७) उदेराम मदनलाल पुरोहित, वारसदार उदेराम मदनलाल पुरोहित<br>८) शोतीलाल मेघराज बोरा (मयत) वारसदार सौ. सविता राजेंद्र भंडारी<br>९) गेनमल चुनीलाल गांधी (मयत) वारसदार – प्रकाश गेनमल गांधी<br>१०) शांतीलाल उत्तमचंद गांधी (मयत) वारसदार – अजित शांतीलाल गांधी<br>११) ताराचंद दगडूराम चोपडा (मयत) श्रीमती लातीबाई ताराचंद चोपडा<br>१२) भागीरथ हेमराज पुरोहित (मयत) वारसदार सतिष भागीरथ पुरोहित (मयत)<br>१३) सतिष भागीरथ पुरोहित (मयत) वारसदार–स्वप्नील सतिष पुरोहित<br>१४) मुरलीधर रामधन शर्मा (मयत) वारसदार – जयश्री मुरलीधर शर्मा<br>१५) पेमराज खिवराज गुंदेचा (मयत) वारसदार – विजय पेमराज गुंदेचा<br>१६) श्रीमल नंदलाल दुगड (मयत) वारसदार – चंपाबाई नंदलाल दुगड<br>१७) सुर्यकांत बन्सीलाल पुरोहित वारसदार – सुर्यकांत बन्सीलाल पुरोहित<br>१८) दामू नेमाजी कुंभार वारसदार श्रीमती चंद्रकलाबाई नारायण देशमुख<br>१९) बाळासाहेब भानुदास काकडे (मयत) वारसदार – प्रमोद भानुदास काकडे<br>२०) पेमराज खिवराज गुंदेचा (मयत) वारसदार– विजय पेमराज गुंदेचा<br>२१) सह्याद्री प्रिंटर्स– प्रेस प्रिंटीग वारसदार हरिभाउ बाळासाहेब काकडे<br>२२) जगन्नाथ रंगनाथ पठाडे – वारसदार संतोष जगन्नाथ पठाडे<br>२३) चंद्रभागाबाई वामन पाटोळे (मयत) वारसदार रमेश सुरेश कदम (पोटभाडेकरू)<br>२४) विजय दत्तात्रय सरोदे वारसदार विजय दत्तात्रय सरोदे<br>२५) विजय दत्तात्रय सरोदे वारसदार विजय दत्तात्रय सरोदे | घ.नं. ३७६१, सि.स.नं. ३४०२, ५६१४, १५, १६ व १८ रतन भुवन, नवीपेठ |
| १३ | १) शहेदा बी. जेनुदीन, रा. MIDC<br>२) शेख इरफान ई स्माईल – रा. MIDC<br>३) शेख अशफाख– रा. एम एम गार्डन<br>४) शेख शहेनाज व मतीन शेख | घ.नं. ३२१७ सि.स.नं. २९५१<br>हलवाई गल्ली,<br>सतरंजी मस्जिद जवळ |
| १४ | श्रीमती सुजाता विजयकुमार भुतकर<br>श्रीमती रूपाली संदिप कोकाटे | घ.नं. सि.स.नं. २५५५<br>जुना बाजार रोड |
| १५ | श्रीमती राधाबाई शिव अण्णा कुटे / नामदेव कुटे श्रीमती चंदुबाई कुटे / प्रविण कुटे | घ.नं. १८२७/२८ व ७०९१ सि.स.नं.<br>सुभेदार गल्ली, झेंडीगेट |

जा.नं. प्रसिद्धी– १०२ दि.३०/०५/२०२५

**शहर अभियंता**
अहिल्यानगर महानगरपालिका

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## पेरू खा, मेंदू सुधारा!



मेंदूच्या आरोग्यासाठी साल्मन, टुनासारखे चरबीयुक्त मासे किंवा अक्रोडसारखा सुका मेवा गुणकारी ठरतो याची माहिती अनेकांना असेल. या दोन्हीमध्ये ओमेगा-थ्री फॅटी ॲसिड असते व त्याचा मेंदूच्या आरोग्याला चांगला लाभ होत असतो. मात्र पेरूसारखे फळही मेंदूसाठी गुणकारी असते याची अनेकांना कल्पना नसते. मेंदूचे आरोग्य राखण्यासाठी आवश्यक असलेली सर्व जीवनसत्त्वे पेरूमध्ये आढळतात. त्यात व्हिटॅमिन बी ३ आणि व्हिटॅमिन बी ६ असते जे मेंदूमध्ये रक्त परिसंचरण सुधारतात आणि तुमच्या मज्जातंतूंना आराम देतात.

पेरूमध्ये कॉपर असते जे हार्मोन्सचे उत्पादन आणि शोषणासाठी आवश्यक असते. हे आपल्या थायरॉईड ग्रंथीला चांगले कार्य करण्यास मदत करते. पेरूमध्ये लाइकोपीनसारखे ॲंटीऑक्सिडंट असतात जे पेशींना नुकसान होण्यापासून वाचवतात. ॲंटीऑक्सिडंट्समुळे ते फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून सुरक्षित राहतात. त्यामुळे कॅन्सरसारख्या आजारांचा धोका कमी होतो. मधुमेहाच्या रुग्णांसाठी पेरू हे उत्तम फळ ठरू शकते. कारण त्यात भरपूर फायबर असते आणि त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. रक्तातील ग्लुकोजची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी हे दोन्ही गुणधर्म आवश्यक आहेत. पेरूमध्ये ॲंटीऑक्सिडंट असतात, जे त्वचेला सुरकुत्यांपासून वाचवतात. जेणेकरून आपण तरुण दिसू लागतो. पेरू खाल्ल्याने वृद्धत्व चेहऱ्यावर लवकर दिसत नाही. बद्धकोष्ठतेच्या समस्येवर पेरू खूप फायदेशीर ठरतो. कारण त्यात फायबर असते ज्यामुळे आतड्याची हालचाल सुलभ होते. पेरूमध्ये व्हिटॅमिन ए आढळते, जरी हे जीवनसत्त्व जास्त नसले तरी ते तुमच्या डोळ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. व्हिटॅमिन सी यामध्ये आढळते, ते तुमची रोग प्रतिकारशक्ती वाढवू शकते.

## घरकामे करणारा यंत्रमानव



अमेरिका, जपानसारख्या देशांमध्ये हरेक नमुन्याचे रोबो बनवण्यात आले आहेत. अमेरिकेत 'टेस्ला'चा ह्यूमनॉइड म्हणजेच मानवाकृती (मानवासारखा आकार असणारा) रोबोट 'ऑप्टिमस' वेगाने विकसित होत आहे. ऑप्टिमस आता काहीही करू शकतो, असे टेस्लाचे संस्थापक एलॉन मस्क यांनी 'वुई, रोबोट' या कार्यक्रमात नुकतेच सांगितले. आपल्या घरातील दैनंदिन कामं करण्यासाठी ह्यूमनॉइड रोबोट उपयोगी पडू शकतो, असेही ते म्हणाले. जसे की, कुत्र्यांना फिरवून आणणं, मुलांचा सांभाळ करणं, बगीचा सजवणं आणि जेवण वाढणं वगैरे कामं रोबोट करू शकणार आहे. ऑप्टिमसच्या नव्या अवताराता रोबोटचा चालण्याचा वेग आणि त्याच्या हाताची हालचाल आधीपेक्षा बरीच सुधारण्यात आल्याचे मस्क यांनी सांगितले. हा रोबोट लोकांना घरातील दैनंदिन कामं करण्यात मोठा हातभार लावेल, अशी मस्क यांना अपेक्षा आहे.

या कार्यक्रमात टेस्लाच्या सायबरकॅब आणि रोबोवन यांचे विशेष आकर्षण होते. तर ऑप्टिमसनं सर्वांची मनं जिंकली. मस्क यांनी ऑप्टिमसच्या हालचालीबद्दल माहिती दिली. 'रोबोट तुमच्याबरोबर चालू शकतात. भविष्यात रोबोटशी बोलताना तुम्हाला अधिक नैसर्गिक वाटेल. तुम्ही एका दुसऱ्या व्यक्तीबरोबरच राहत आहात, असे जाणवेल', असे मस्क म्हणाले. यावेळी गंमत करताना ते म्हणाले की, 'रोबोट तुमच्या घरातील समारंभात पाहुण्यांना ड्रिंक्सही देऊ शकतात.' टेस्लाने अनावरण केलेल्या ऑप्टिमसच्या नव्या अवताराला जेन २ (दुसरी जनरेशन) असे म्हटले जात आहे. आधीच्या अवतारापेक्षा यात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. रोबोटचे सेन्सर, हात, पाय आणि बोटांच्या हालचाली मानवाप्रमाणे सहज करण्यात आल्या आहेत.

यामळे ऑप्टिमसला आणखी अवघड कामे करणे सोपे जाणार आहे. हे रोबोट काय करू शकतात, याचा एक व्हिडीओ मस्क यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओत दिसते की, ऑप्टिमस रोबोट शर्टाची घडी घालतो. बाजारातून आणलेले सामान पिशवीतून काढून टेबलावर मांडून ठेवतो, कुटुंबासह अनेक कामात तो सहभागी होतो. मस्क म्हणाले की, आम्ही हळूहळू रोबोटमध्ये विकास करत आहोत.

टेस्लाने २०२१ साली ऑप्टिमस रोबोटची कल्पना मांडली होती. मानव जी धोकादायक कामं करतो, ती करण्यासाठी रोबोटची निर्मिती करण्याची कल्पना मांडली गेली. मात्र हा रोबोट तयार करण्यात आणखी वेळ लागणार असल्याचे सांगितले जात आहे. २०२२ साली एलॉन मस्क यांनी ऑप्टिमसची पहिली आवृत्ती सादर केली होती. ज्यामध्ये रोबोट साधी साधी कामं करताना दिसत होता. जसे की, घरातील कुंड्यांना पाणी घालणे वैगरे. मात्र दुसऱ्या जनरेशनमध्ये काही बदल केले आहेत.

## स्मार्टफोन धुवा साबण लावून!



स्वच्छतेचा दृष्टिकोन समोर ठेवून जपानमध्ये एक अनोखा स्मार्टफोनही विकसित केलेला आहे. आपल्याकडे असलेल्या मोबाईल किंवा स्मार्टफोनवर अनेक जीवाणू असतात, पण तो साफ करता येत नाही. स्मार्टफोन पाण्याने धुतला किंवा पाण्यात पडला तर निरूपयोगी होतो. मात्र, एका जपानी कंपनीने जगातील पहिला जलावरोधक स्मार्टफोन बनवलेला असून तो चक्क साबण व पाण्याने धुता येतो.

जपानमध्ये जलावरोधक स्मार्टफोन आधीच बाजारात होते; असे असले तरी जीवाणूपासून मुक्ततेसाठी तो साबणाच्या पाण्याने धुणे शक्य नव्हते, आताचा हा फोन रगडून धुतला तरी त्याला काही होणार नाही अशी उत्पादकांची हमी आहे. मोबाईल स्वच्छतेच्या या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी क्योसेरा या जपानी कंपनीने डिग्नो राफ्रे हा स्मार्टफोन तयार केला आहे, तो साबणाच्या पाण्यात टाकला तरी काही होत नाही. त्यामुळे तो घाण झाला तर धुता येतो. क्योसेरा या जपानी इलेक्ट्रॉनिक्स व सेरॅमिक्स उत्पादकांच्या मते स्वयंपाकघरात, रुग्णालयात व आंघोळ करतानाही हा स्मार्टफोन वापरता येईल, त्याच्या स्पर्श पट्टिका या तो ओला झाला तरी काम करतात. क्योसेराच्या डिग्नो राफ्रे या फोनमध्ये स्मार्ट सॉनिक रिसीव्हर आहे, त्यामुळे ध्वनिवर्धकाशिवाय आवाज ऐकू येतो. राफ्रे हा ॲंड्राईड फोन असून त्याचा पडदा ५ इंचांचा व ७२० पिक्सेलचा आहे. कॅमेरा १३ मेगापिक्सेल असून जाडी १०.१ मि.मी आहे. त्याची बॅटरी तीन हजार ॲम्पियर तास क्षमतेची असून ती वीस तास चालते. या फोनची किंमत ३१ हजार ठेवण्यात आली होती.

## स्मार्टफोन चार्ज करताय?



**स्मार्टफोनची बॅटरी जास्त काळ काम करत राहण्यासाठी ती योग्य प्रकारे चार्ज करणे खूप गरजेचे आहे. अयोग्य चार्जिंगमुळे बॅटरी खराब होऊ शकते. तसेच फोनच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. स्मार्टफोन चार्ज करण्याची योग्य पद्धत नेमकी कशी आहे पाहू या :**

- ओरिजिनल चार्जरचा वापर करा. नेहमी आपल्यासोबत फोनचे ओरिजिनल चार्जर ठेवा. दुसरे चार्जर वापरल्यामुळे बॅटरीचे नुकसान होते.
- स्मार्टफोनची बॅटरी पूर्णपणे डिस्चार्ज होऊ देऊ नका. जेव्हा बॅटरी २०% च्या खाली जाते, तेव्हा ती चार्ज करणे सुरू करा आणि ८०% चार्ज झाल्यावर ती काढून टाका.
- एकदा फोन पूर्णपणे चार्ज झाला की चार्जरमधून काढून टाका. फोन चार्जरला जास्त वेळ जोडून ठेवल्याने बॅटरी खराब होऊ शकते.
- खूप गरम किंवा खूप थंड ठिकाणी स्मार्टफोन चार्ज करू नका. उष्णता किंवा थंडीमुळे बॅटरी खराब होऊ शकते.
- जलद चार्जिंग दीर्घकाळासाठी बॅटरीचे नुकसान करू शकते. म्हणून ते जपून वापरा.
- अनेक स्मार्टफोन्समध्ये बॅटरी सेव्हर मोडची सुविधा असते. हा मोड चालू करून तुम्ही बॅटरीचे आयुष्य वाढवू शकता.
- स्मार्टफोनच्या सेटिंग्जमध्ये काही बॅटरीशी संबंधित सेटिंग्ज आहेत. जसे की ऑटो-ब्राइटनेस, लो-पॉवर मोड. या सेटिंग्ज योग्यरित्या सेट करून तुम्ही बॅटरीचे आयुष्य सुधारू शकता.

## नीलहरित शैवालापासून वीजनिर्मिती




वीजनिर्मितीसाठी अनेक मार्ग शोधले जात असतात. आता नीलहरित शैवालापासून विद्युत ऊर्जा निर्माण करणारे तंत्रज्ञान शोधण्यात आले असून त्यामुळे आगामी काळात सेलफोन व संगणकांनाही विद्युत पुरवठा करता येईल. हे संशोधन करणाऱ्यात एका भारतीय वैज्ञानिकाचाही समावेश आहे.

काँकॉर्डिया अभियांत्रिकी विद्यापीठातील प्रा. मुथुकुमारन पाकिरीसामी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या संशोधनानुसार नीलहरित शैवाल ज्या पद्धतीने प्रकाशसंश्लेषण करतात त्यातून विद्युत ऊर्जा तयार करता येते. प्रकाश संश्लेषण व वनस्पतींचे कार्बन वायू घेणे यातून इलेक्ट्रॉनचे स्थानांतरण होत असते. पाकिरीसामी यांच्या मते या दोन्ही क्रियांमध्ये नैसर्गिकरित्या विद्युत ऊर्जा तयार होते. सायनोबॅक्टेरिया या नीलहरित शैवालाचा यात वापर करता येतो. पृथ्वीवरील जैविक घटकांपैकी हे एक शैवाल आहे. सर्व उंचीवरील पृष्ठभागावर हे शैवाल आढळून येते. ते शैवाल नष्ट होणारे नाही. या सूक्ष्म जीवांमुळेच पूर्वीच्याकाळी ऑक्सिजनची निर्मिती झाली, त्यातून प्रगत जीव पुढे तयार झाले. जगात सतत चालू असलेल्या या नैसर्गिक प्रक्रियेतून आपल्याला कार्बन मुक्त ऊर्जा तयार करता येते. हे संशोधन अजून बाल्यावस्थेत असल्याचे पाकिरसामी यांचे मत आहे. विद्युत घट तयार करण्यासाठी व त्यांच्या व्यावसायिक वापरासाठी अजून बराच काळ लागेल. सध्या फॉस्फोसिंथेटिक सेल (विद्युतघट) लहान आकारात अस्तित्वात आहेत. त्यात कॅथोड व ॲनोड असतो, तसेच प्रोटॉनची देवाणघेवाण होऊ शकेल असे अर्धपारपटलही असते. सायनोबॅक्टेरिया किंवा नीलहरित शैवाल ही ॲनोड कक्षात ठेवली जातात. प्रकाशसंश्लेषणात सायनोबॅक्टेरिया हे इलेक्ट्रॉन इलेक्ट्रोडच्या पृष्ठभागावर सोडतात. बाह्य विद्युतभार हा संयंत्राला जोडलेला असल्याने इलेक्ट्रॉन बाहेर काढून विद्युत ऊर्जा मिळवता येते. बऱ्याच संशोधनानंतर हे तंत्रज्ञान संगणक व सेलफोनला विद्युत पुरवठा करण्यासाठी वापरता येईल, त्यात सूक्ष्म फोटोसिंथेटिक विद्युत घटांच्या मदतीने वीज पुरवठा शक्य आहे.

## आंबवलेले चॉकलेट

आंबवलेले पदार्थ पोटातील उपयुक्त जीवाणूंसाठी गुणकारी असतात, असे सांगितले जात असते. मात्र चॉकलेट तयार करण्यासाठीही आंबवण्याची क्रिया केली जाऊ शकेल, असे आपल्याला वाटणार नाही. चॉकलेट वेगवेगळ्या स्वादांमध्ये उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात असतो. कोकोवर यीस्टच्या मदतीने आंबवण्याची क्रिया केली, तर अतिशय वेगळ्या स्वाद व सुवासाची चॉकलेटस् तयार करता येतात, असे वैज्ञानिकांनी म्हटले आहे. विशिष्ट प्रकारची ही चॉकलेटस् साधारण चॉकलेटस् पेक्षा वेगळी असतात.



बेल्जियममधील फ्लॅंडर्स इन्स्टिट्यूट ऑफ बायोटेक्नॉलॉजी व युनिव्हर्सिटी ऑफ लेऊवेन या संस्थातील जॅन स्टीनसेल्स यांनी सांगितले, की बुटीक म्हणजे अतिशय विशिष्ट स्वरूपाची चॉकलेटस् तयार करणे यातून शक्य होणार आहे, शिवाय चहा, कॉफी यांच्यातही वेगळा स्वाद निर्माण करता येणार आहे. सुरुवातीला संशोधकांनी कोकोच्या मदतीने यीस्टचे असे प्रकार शोधले, की एरवी कोकोच्या आंबण्याच्या क्रियेत जी यीस्ट तयार होतात, त्यांना निष्प्रभ करून ही नवीन यीस्ट काम करतात. कोकोबीन्स गोळा करून प्लास्टिकच्या डब्यात ठेवतात किंवा जमिनीवर ठेवतात, असे सांगून एश्टर मीर्समन यांनी म्हटले आहे, की त्या

कोकोच्या बियांभोवती गर ठेवला जातो व नंतर ते यीस्ट व जीवाणूंच्या मदतीने आंबवले जातात, पण या क्रियेत पर्यावरणातील कुठलीही प्रजाती त्यात मिसळली जाऊ शकते त्यामुळे चॉकलेट किंवा त्या कोकोवर आधारित कुठल्याही उत्पादनाचा स्वाद व सुगंध बदलतो पण आता त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक शक्तिशाली असे वेगळे यीस्ट वापरण्यात आले. ते इतर जीवाणूंचा प्रभाव पडू देत नाहीत. संशोधकांच्या मते चॉकलेटचे विविध स्वाद या किण्वन क्रियेत तयार करता येतात, जे एरवी कुठल्याच चॉकलेटमध्ये सापडत नाहीत. आता यीस्टचे संकरित प्रकार यात वापरले असून त्यामुळे वेगळा स्वाद व सुगंध तयार होतो. यातून निर्माण होणारी संयुगे मेदात मिसळले जात असल्याने ते बाष्पीभवनाने ते निघून जाऊ शकत नाहीत. यात दोन यीस्टच्या प्रजातींचे गुणधर्म वापरले आहेत. त्यामुळे चॉकलेट निर्मात्यांना आता वेगळ्या स्वादाची व सुगंधाची चॉकलेटस् तयार करता येणार आहेत. ॲप्लाइड ॲंड एनव्हायर्नमेंटल मायक्रोबायोलॉजी या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## वृद्धत्व लांबवायचंय?


**लवकर म्हातारपण येऊ नये, त्वचा तजेलदार रहावी आणि शरीरातील ऊर्जाही टिकून रहावी, अशी अनेकांची इच्छा असते. त्यासाठी विशिष्ट आहार उपयुक्त ठरत असतो. आहारतज्ज्ञांनी दिलेली अशाच काही खाद्यपदार्थांची ही माहिती...**



**बेरीज :** स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, रास्पबेरी अशा विविध प्रकारच्या बेरींमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स असतात. या घटकांमुळे त्वचेला होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण मिळते आणि त्वचा चमकदार राहते. तसेच या बेरीजमध्ये व्हिटॅमिन सी असते, जे कोलाजेनच्या निर्मितीसाठी उपयुक्त आहे. त्याच्यामुळे त्वचेत लवचिकता येते आणि सुरकुत्या कमी होतात.



**हिरव्या पालेभाज्या :** पालक आणि इतर हिरव्या पालेभाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आयर्न, व्हिटॅमिन के, कॅल्शियम आणि ॲंटिऑक्सिडंटस्? असतात. या पालेभाज्या तुमच्या शरीराला विषारी घटकांपासून मुक्त ठेवतात आणि तुमचं हृदय व मेंदू यांना तंदुरुस्त ठेवतात, ज्यामुळे वयाचा परिणाम कमी होतो आणि शरीर सशक्त राहतं.




**जवस :** जवस किंवा अळशीच्या बिया सुद्धा 'ॲला' फॅटी ॲसिडने परिपूर्ण असतात. या बिया हृदयाचे आरोग्य मजबूत करण्यासोबतच शरीरातील सूज कमी करतात. शिवाय या बिया ट्रायग्लिसराइडस्? कमी करतात ज्यामुळे वेदना आणि सूज कमी होते. डोळे, केस आणि त्वचेसाठी अळशीच्या बिया वरदानापेक्षा कमी नाहीत.



**मासे :** मासे, विशेषतः फॅटी फिश हे ओमेगा ३ फॅटी ॲसिडने समृद्ध असतात. हे खाल्ल्याने ट्राईग्लिसाईडस्चा धोका कमी होतो. मासे ब्लड प्रेशर कंट्रोल करतात. मेंदूवर वाढत्या वयाचा प्रभाव होतच नाही आणि मानसिक थकवा किंवा कमजोरी आपोआप दूर होते.



**सुका मेवा :** नटस्? किंवा सुका मेवा अतिशय आरोग्यदायी ठरतो. बदाम, अक्रोड आणि काजू यासारख्या नटस्मध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्? असतात, जे मेंदूसाठी आणि त्वचेसाठी अत्यंत उपयुक्त असतात. नटस्? खाल्ल्याने त्वचेच्या पेशींची दुरुस्ती होते आणि मेंदूला आवश्यक पोषण मिळते, ज्यामुळे तुमचं मनही शांत आणि स्थिर राहते.



**दही :** दह्यामध्ये असणारे प्रोबायोटिक्स पचनसंस्थेला सशक्त ठेवतात आणि पोटातील चांगल्या बॅक्टेरियांचा विकास करतात. यामुळे तुमचे पचन सुधारते, त्वचा ताजीतवानी दिसते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. याशिवाय, दही तुमच्या कॅल्शियम आणि प्रोटीनची पूर्तता करते, ज्यामुळे तुमची हाडं सशक्त राहतात.



**चिया सीडस्? :** चिया किंवा सब्जा सीडस्मध्ये 'ॲला' नावाचे ओमेगा ३ फॅटी ॲसिडस्? आढळतात. या बिया म्हातारपणाची प्रक्रिया मंद करतात आणि पचनक्रिया मजबूत बनवतात. शिवाय शरीरातील हायड्रेशन नियंत्रित करतात. या बिया त्वचा, वजन घटवणे, केस, हाडे यासाठीही खूप लाभदायक आहेत.

## आढळली प्राचीन जेडची कलाकृती

चीनमध्ये पाच हजार वर्षांपूर्वीच्या एका थडग्यात जेडपासून बनवलेली ड्रॅगनची कलाकृती सापडली आहे. ही कलाकृती ६.२ इंच लांब व ३.७ इंच रुंदीची आहे. एका गोलाकार थडग्यामध्ये ही कलाकृती सापडली. या थडग्यात मानवी अवशेषही सापडले आहेत. तसेच मातीची अनेक भांडीही याठिकाणी आढळून आली.

चीनच्या इनर मंगोलिया ऑटोनोमस रिजनमधील चिफेंग शहरात करण्यात आलेल्या उत्खननात हे थडगे आढळले. ते ५ हजार ते ५१०० वर्षांपूर्वीच्या काळातील आहे. त्यावेळी या परिसरात होंगशान संस्कृती फुलली होती. या संस्कृतीमधील लोक शेती करीत, उंच इमारती असलेली शहरे बनवत आणि सुंदर कलाकृतीही तयार करीत. होंगशान संस्कृतीमधील लोकांनी जेडपासून बनवलेल्या ड्रॅगन कलाकृतींचा एक सुंदर नमुना आता उत्खननात सापडलेला आहे. अर्थात हे संशोधन जरी महत्त्वाचे असले तरी नवे नाही, असे जेरुसलेममधील द हिब्रू युनिव्हर्सिटीच्या ईस्ट एशियन स्टडीजचे प्राध्यापक गिडियन शेलाच-लावी यांनी म्हटले आहे. यापूर्वीही होंगशान संस्कृतीमधील थडग्यांमध्ये अशाच जेड ड्रॅगन कलाकृती सापडलेल्या आहेत.



# अहिल्यानगर गौरव दिनी शहरात भव्य शोभायात्रा

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी निमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्यावतीने आयोजित अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवास उत्साहात सुरवात झाली. यानिमित्ताने अहिल्यानगर शहरातून सायंकाळी आकर्षक शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचा ऐतिहासिक, धार्मिक, पारंपरिक व सांस्कृतिक वारसाचे प्रदर्शन करणारे १६ आकर्षक रथ सहभागी झाले होते. दिल्लीगेट येथून शिवगर्जनेने व ढोल ताशाच्या गजरात शोभायात्रेस सुरवात झाली. डॉ.सुजय विखे व आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते विशाल गणपतीच्या रथास नारळ वाढवून शोभायात्रेचे उद्घाटन झाले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्यावतीने आयोजित अहिल्यानगर गौरव दिननिमित्त जिल्ह्याचा ऐतिहासिक, धार्मिक, पारंपारिक व सांस्कृतिक वारसाचे प्रदर्शन करणारी भव्य आकर्षक शोभायात्रा काढण्यात आली.

भगवे झेंडे व सर्वांनी परिधान केलेल्या भगव्या टोप्या, महिलांचे मर्दानी डाव, सहभागी आकर्षक रथ सर्वांचे लक्ष वेधत होते. पारंपरिक वाद्यांच्या तालात शिस्तबद्ध निघालेल्या यायात्रेस नगरकरांनी प्रतिसाद दिला. यावेळी आबालवृद्धांनी शोभायात्रा पाहण्यास गर्दी केली होती.

शोभायात्रेच्या अग्रभागी ग्रामदैवत श्री विशाल गणपतीचा रथ, त्यामागे प्रभू श्रीराम, अहिल्यादेवी होळकर, आनंदऋषीजी महाराज, अगस्तीऋषी, आद्य क्रांतीकारी राघोजी भांगरे, संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर, शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, हिंदुजागृती समिती, सद्गुरु गोदड महाराज, साईबाबा, शेख मोहंमद बाबा, संत भगवान बाबा, वीर जवान व अखंड भारत आदी व विद्युत रोषणाई केलेले आकर्षक रथांचा समावेश होता.

शोभायात्रेत अकोले येथील आदिवासी कंबड नृत्य, महिलांचे टिपरी व फुगडी नृत्य, कर्जतच्या पाटेवाडी येथील धनगर समाजाचे गजनृत्य, हिंदू जनजागृती समितीचे मर्दानी खेळांचे सादरीकरण करणाऱ्या महिलांचे पथक, वारकरी संप्रदायाचे बाल वारकरी, प्रभू श्रीरामाची भव्य मूर्ती व छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, जिल्ह्यात होणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाची प्रतिकृती तसेच सद्गुरु गोदड महाराजांच्या यात्रेतील भव्य रथाची प्रतिकृती आदींचा समावेश होता. मार्गावर ठिकठिकाणी फटाके वाजवून व पुष्पवृष्टी करून नागरिक या शोभायात्रेचे स्वागत करत होते.

यावेळी डॉ.सुजय विखे म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्याच्या धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा व परंपराचे प्रदर्शन करणारी एव्हढी मोठी शोभायात्रा प्रथमच निघाली आहे. विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी महिनाभर मेहनत घेतल्याने हा अहिल्यानगर गौरवदिनाचा सोहळा यशस्वी झाला आहे. विचार भारतीने या सोहळ्याचा विचार मांडला व त्यास सर्वांनी प्रतिसाद दिला. येणाऱ्या काळातही अशाच कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

रवींद्र मुळे म्हणाले, आपण आपल्यावर असलेल्या गुलामगिरीच्या खुणा पुसून टाकल्यावर समाजात कसे नवे चैतन्य निर्माण होते, हे या शोभायात्रेच्या माध्यमातून आपण सर्वांनी दाखवून दिले आहे. अहिल्यानगरचा जो मोठा इतिहास आहे, तो आज या शोभायात्रेतून दिसला आहे. अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त पुढील दोन दिवस होणाऱ्या कार्यक्रमातही सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

या यात्रेत पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्ष धनश्री विखे, कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, निमंत्रक बाबासाहेब वाकळे, उपाध्यक्ष धनंजय जाधव, निखील वारे, राजेंद्र तागड, विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, उपाध्यक्ष अनिल मोहिते, अशोक गायकवाड, महेंद्र जाखेटे, रथयात्रा प्रमुख उदय भणगे, रवींद्र बारस्कर, मनोज झंवर, कमलेश भंडारी, अंकुश गोळे, प्रशांत आढाव, अनिल बोरुडे तसेच जनसेवा फाउंडेशनचे पदाधिकारी, हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, महायुतीतील पदाधिकारी व नागरिक सहभागी होते.

### शोभायात्रेने पाडले नवे पायंडे

गुरवारी निघालेल्या शोभायात्रेने शहरात काही नवे पायंडे पाडले आहेत. ही शोभायात्रा शहर व उपनगरला जोडणाऱ्या नव्या मार्गाने काढण्यात आली. जाहीर केल्याप्रमाणे वेळेत सुरु झाली व संपली. शोभायात्रा सायंकाळी ६ वाजता सुरु झाली व रात्री ९ वाजता संपली. पारंपरिक वाद्यांचा वापर, कोणताही बिभस्तपणा शोभायात्रेत नव्हता. त्यामुळे या शोभायात्रेचे कौतुक नगरकरांनी केले.

# अहिल्यादेवी होळकर यांचे विचार दिशादर्शक व प्रेरणादायी

**डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन; बोरुडे मळा येथे त्रिशताब्दी गौरव महोत्सवानिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन**

नगर – बालिकाश्रम रोड परिसराच्या विकास कामांमध्ये बोरुडे परिवाराचे मोठे योगदान आहे. या परिसरामध्ये ते वर्षभर विविध सांस्कृतिक सामाजिक उपक्रम राबवून समाजाप्रती असलेली ही भावना यातून दिसून येते. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त अनिल बोरुडे यांनी पारंपारिक पद्धतीने शोभायात्रेचे स्वागत केले. तसेच राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांचे विचार समाजाला दिशादर्शक व प्रेरणादायी आहे. अनिल बोरुडे हे आता नव्याने आमच्यात येणार आहे. त्यांचे स्वागत अहिल्यानगर शहर विकासासाठी आम्ही सर्वजण मिळून काम करत असल्याचे प्रतिपादन सुजय विखे पाटील यांनी केले.



अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंतीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर गौरव दिन महोत्सवानिमित्त शोभायात्रेचे स्वागत बोरुडे मळा येथे पारंपरिक पद्धतीने केले. (छाया – लहू दळवी)

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंतीनिमित्त विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर गौरव दिन महोत्सवानिमित्त शोभायात्रेचे स्वागत बोरुडे मळा येथे पारंपरिक पद्धतीने केले. यावेळी माजी उपमहापौर अनिल बोरुडे व माजी सभापती पुष्पाताई बोरुडे यांच्या वतीने स्वागत करून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील, आ. संग्राम जगताप, धनश्री विखे पाटील, विचार भरतीचे अध्यक्ष राजाभाऊ मुळे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, दगडू मामा पवार, धनंजय जाधव, रवींद्र बारस्कर, निखिल वारे, अशोक गायकवाड, रामदास आंधळे, संपत नलवडे, अनिल मोहिते, सुधीर लांडगे, राजेंद्र पाचे आदि उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणले की, अहिल्यानगर गौरव महोत्सवानिमित्त शोभायात्रा झाली. अनिल बोरुडे यांनी नेहमीच महापुरुषांचे विचार अंगीकारून समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. विकासकामांच्या योजना यशस्वीपणे राबवून चांगले काम उभे केले आहे, असे ते म्हणाले.

डॉ. सुजय विखे पाटील व आ. संग्राम जगताप त्यांच्या माध्यमातून शहरात सुरू असलेले काम कौतुकास्पद आहे. विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे विचार समाजामध्ये पोचविण्याचे काम करत आहे, ही बाब कौतुकास्पद असल्याचे मत अनिल बोरुडे यांनी व्यक्त केली.

अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त

## इंदोरीकर महाराजांचे ३१ मे रोजी किर्तन



संगमनेर – संगमनेर तालुक्यातील डिग्रस येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवा – निमित्त सकाळी ८ ते ९ मिरवणूक व ९.३० ते १० मुर्तीपूजन आणि सकाळी १० ते १२ या वेळेत समाज प्रबोधनकार, महाराष्ट्रभूषण ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचे किर्तन होणार आहे.

डिग्रस पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी किर्तनासाठी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यादेवी प्रतिष्ठान डिग्रस व सर्व ग्रामस्थ डिग्रस यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा सत्कार

नगर – जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा स्नेहबंध फाउंडेशनतर्फे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सत्कार करून त्यांना उत्कृष्ट कार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.



भंडारी हे पुणे येथील रहिवासी आहेत. ते यापूर्वी जमावबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे येथे कार्यरत होते. ग्रामपंचायत प्रशासन, पंचायत राज व्यवस्था सक्षमीकरण, मृद व जलसंधारण, पर्यावरण रक्षण व संवर्धन, स्वच्छ भारत अभियान, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, विविध विकास योजनांची अंमलबजावणी, शासनाच्या विविध अभियानांची अंमलबजावणी आदी क्षेत्रात भंडारी यांनी भरीव काम केले आहे.

भंडारी यांना २०१८ मध्ये ग्रामविकास विभागाचा 'गुणवंत अधिकारी पुरस्कार' देऊन राज्यपालांच्या हस्ते गौरविण्यात आले होते. त्यांना जिल्ह्यात नव्या वाटचालीसाठी डॉ. उद्धव शिंदे यांनी स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार केला.

# कोठला येथे रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या सात जणांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – शहरातील कोठला परिसरात रस्त्याच्या मध्ये वाहतुकीस अडथळा होऊन वाहतूक कोंडी होईल अशी परिस्थिती निर्माण करीत हातगाड्या, टपऱ्या, शेड टाकून अतिक्रमण करणाऱ्या ७ जणांवर तोफखाना पोलिसांनी कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई २९ मे रोजी दुपारी करण्यात आली.

तोफखाना पोलीस वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये शहरात पेट्रोलिंग करीत असताना कोठला चौकातील राज चेंबरजवळ पश्चिमेकडे तोंड करुन रस्त्याच्या मधोमध, रहदारीस व वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होईल व एखाद्याच्या जीवास धोका निर्माण होईल अशा रीतीने सात हातगाडी टपरी उभी करुन रस्त्यावर अडथळा निर्माण करीत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यातील बापूशाह पुरीभाजी नावाची हातगाडी चालक मोहम्मद हनीफ शेख (वय ७०, रा. अल्फा गॅरेज जवळ, कोठला चौक), माऊली चहाची टपरी चालक रवींद्र मोतीराम भिंगारे (वय ४०, रा.मंगलगेट अ.नगर), वडापाव हातगाडी चालक लक्ष्मण मधुकर सोनवणे (वय ६०, रा. कोठला अ.नगर), चहाची टपरी चालक रफिक अब्दुल्ला सय्यद (वय ५४), यादगार चहाची टपरी चालक शाहरुख मीर सय्यद (वय २७,रा. कोठला), माऊली पान टपरी चालक आकाश अंबादास वाडेकर (वय २७, रा. मंगलगेट मच्छी मार्केट जवळ, अ.नगर), बापूशाह पान सेंटर चालक इलियास कासम शेख (वय ५९ रा. कोठला झोपडपट्टी, अ.नगर) यांच्या वर गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस हवालदार योगेश चव्हाण, महेश पाखरे, रमेश शिंदे, बांगर, आव्हाड, शेळके यांनी केली.

### अतिक्रमण काढताना पोलिसांचा लाठीचार्ज

कोठला येथील अतिक्रमण काढताना महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथकास व पोलिसांना काही नागरिकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असता, अतिक्रमणास विरोध करु नका. कायदेशीर कारवाई केली जात आहे असे समजून सांगितले. परंतु तरीही जमावाने आक्रमकरित्या हरकत घेतल्याने पोलिसांनी यावेळी लाठीचार्ज केला. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक अमोल भारती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्यासह तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार यांनी केली.

# पावसाळ्यात स्मशानभूमीत अंत्यविधीस अडचणी; नव्या शेड व लाईटसाठी विकासनिधीची आवश्यकता

**निधी उपलब्ध करून द्यावा : भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे मागणी**

नगर – भिंगार शहरातील स्मशानभूमीची दुरवस्था लक्षात घेता, नागरिकांना अंत्यविधीसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे स्मशान–भूमीच्या विकासासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ यांनी आमदार संग्राम जगताप यांना दिले. यावेळी जहीर सय्यद, विशाल बेलपवार यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.




भिंगारमधील स्मशानभूमीच्या विकासासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली आहे.

स्मशानभूमीतील सध्याची परिस्थिती अतिशय खराब असून, पत्र्याचे शेड पूर्णतः जीर्ण झाले आहे. विशेषतः पावसाळ्यात अंत्यविधी करताना व शेडच्या अभावामुळे दुःखद प्रसंगीही अडचणींचा सामना करावा लागतो. याशिवाय, रात्रीच्या वेळेस लाईटची कमतरता असल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

भिंगार स्मशानभूमीत नव्याने पत्र्याचे शेड उभारावे, लाईटची व्यवस्था करावी तसेच दशक्रिया विधीसाठी बसण्यास बनविलेल्या ओट्याच्यावर शेडची व्यवस्था करावी व स्मशान भूमीच्या इतर विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

भिंगारमधील अनेक प्रलंबीत विकास कामे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून मार्गी लागली आहेत. सध्या पावसाळ्यात स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी अडचण निर्माण होत आहे. आमदार जगताप यांच्या माध्यमातून सदर स्मशान भूमीसाठी भरीव निधी उपलब्ध होवून प्रश्न सुटणार आहे, असे संजय सपकाळ म्हणाले.



जुन्या आरटीओ कार्यालयासमोर महानगरपालिकेच्या जागेत करण्यात आलेले पक्के अतिक्रमण अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने कारवाई करून हटवले.

# अतिक्रमण हटवून जागेला कंपाऊंड करून महानगरपालिकेने जागा घेतली ताब्यात

**कोठला, बसस्थानक परिसरातही महापालिका, पोलिस प्रशासनाची संयुक्त कारवाई**

नगर – शहरातील जुन्या आरटीओ कार्यालयासमोर महानगरपालिकेच्या जागेत करण्यात आलेले पक्के अतिक्रमण अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने कारवाई करून हटवले. तेथील पत्र्याच्या शेड, ऑफीस केबिन जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करून जागेला कंपाऊंड करून जागा ताब्यात घेण्यात आली. पोलिस अधीक्षक कार्यालय चौकालगत असलेल्या महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीशेजारी असलेल्या जागेत अतिक्रमण करून वाहन खरेदी विक्रीचा व्यवसाय थाटण्यात आला होता. तेथील अतिक्रमण महापालिकेने यापूर्वी कारवाई करून काढले होते. दरम्यानच्या काळात अतिक्रमणधारकांनी न्यायालयात याचिका दाखल केली व जागेवर दावा करून पुन्हा अतिक्रमण करून व्यवसाय सुरू केला. सदरची जागा महापालिकेच्या मालकीची असून, नगरपरिषद काळात या ठिकाणी उद्यानही होते. त्यामुळे न्यायालयात झालेल्या सुनावणीत ही जागा महापालिकेची सरकारी जागा असल्याचे स्पष्ट झाले व जागा तत्काळ खाली करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने अभियंता सुरेश इथापे यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करून अतिक्रमण हटवले. तसेच, जागेला तत्काळ तार कंपाऊंड करून जागा ताब्यात घेण्यात आली आहे. महापालिकांच्या जागांवरील अतिक्रमणांचा आढावा घेतला जात आहे. टप्प्याटप्प्याने या जागांवरील अतिक्रमणे कारवाई करून हटवण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

दरम्यान, शहरातील वाहतूक कोंडीची समस्या मार्गी लावण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका, कोतवाली पोलिस व तोफखाना पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई सुरू केली आहे. कोठला स्टँड, माळीवाडा बसस्थानक परिसरात अतिक्रमणांवर कारवाई करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत.

# अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेसह पगार बंदीला स्थगिती

नगर – राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला शासनाने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश झाल्यानंतरही समायोजनाची प्रक्रिया सुरू होती. समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही थांबवण्यात आले होते. याबद्दल शिक्षण संचालक यांनी संचमान्यता, समायोजन आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी सांगितले.

याप्रसंगी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरुमकर आदी उपस्थित होते

यासंदर्भात माजी आमदार कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांच्यासह वरील पदाधिकाऱ्यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन, न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असल्याचे, पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. आरटीई कायद्यातील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियमावली १९८१ यांच्याशी विसंगत १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय असल्याचेही लक्षात आणून दिले होते. त्यानंतर आता शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवल्याचे जाहीर केले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबधीत आदेश मुंबईसह लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तूर्तास दूर झाले आहे. याबद्दल सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव आणि शिक्षण संचालक यांचे आभार मानले आहेत. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत समायोजनाची सगळीच प्रक्रिया थांबवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कोर्टाच्या निर्णयाची अवमान होणार नाही, याबद्दल आदेश देण्यात आले आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

